# सुधीर

## (त्याच्यावरील प्रीत कवितांचा संग्रह - भाग ३)

रचना

**डॉ. मंजूषा कुलकर्णी**

(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)

मंजुभारती प्रकाशन

**पुणे**

**सुधीर** – (त्याच्यावरील प्रीत कवितांचा संग्रह – भाग ३)

**रचना** : डॉ. मंजूषा कुलकर्णी
(साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त लेखिका, कवयित्री)
साकेत / २५, जयवंत पालकर मार्ग,
पोद्दार रुग्णालयासमोर वरळी, मुंबई – ४०० ०३०.
भ्रमणध्वनी – ९०८२१६१५२४, ९८२२८३९४९१
Email : dr.manjushak@gmail.com

**कायमस्वरूपी पत्ता :** २३१, समर्थ अलंकार, फ्लॅट–२,
कवितांच्या बागेसमोर, ज्योतीनगर,
छत्रपती संभाजीनगर – ४३१ ००५.

**प्रकाशक** : सौ. उल्का मंगेश कुलकर्णी
**मंजुभारती प्रकाशन**
'अे' ५०४, महालक्ष्मी पॅलेस,
वेंकटेश शर्विल सोसायटी समोर,
सी.एन.जी. पंपासमोर, पारी कंपनी चौक,
नऱ्हे, पुणे – ४११०४१.

**प्रथम आवृत्ती** : फाल्गुन शु. १३, शके १९४५,
शुक्रवार, दि. २२ मार्च, २०२४

**अक्षर जुळवणी** : सौ. अनिता विनायक भालेराव
क्रिएशन,
जयश्री, १–एन, सेक्टर ए, एन–१,
सिडको, छत्रपती संभाजीनगर – ४३१००३.
भ्रमणध्वनी – ९४२३३ ९६८८१

**मुद्रक** : स्टार कॉपीयर्स प्रायव्हेट लिमिटेड
कुमठेकर मार्ग, सदाशिव पेठ, पुणे ३०

**ISBN** : 971-81-970674-8-8

**सर्वाधिकार** : © लेखिकेच्या स्वाधीन

**किंमत** : **₹ १५०/–**

# समर्पण

आपल्या प्रियतेमवर
जीवापाड प्रेम करणाऱ्या,
तिला जपणाऱ्या सर्व प्रेमवीरांना
ही कृती सादर समर्पित !

# मनोगत

या जगात सर्वात सुंदर भावना जर कोणती असेल तर ती 'प्रेम' ही प्रेमाने जग जिंकता येणं म्हणतात. एखाद्यासाठी एखादी व्यक्तीच जग होऊन बसत असते. कुणीतरी आपल्या नजरेत भरतं. मग ह्रदयात शिरतं, मग आयुष्यच होऊन जातं. ते नातं प्रेमाच्या शिंपणानं बहरत जातं. या प्रीतीच्या भावना इतक्या तरल, अलवार व हळव्या असतात की पुरुष मनालाही लोण्याहून मऊशार करून जातात.

या संग्रहात पुरुष मनातील प्रियतमेबद्दलच्या भावना काव्यरूपात अवतरल्या आहेत. बरेच जण मला प्रश्न विचारतात की, तुम्ही एक स्त्री असूनही पुरुष मनाच्या या प्रेमभावना इतक्या सुंदरपणे, हुबेहूब कशा उतरवू शकता? मला एकच सांगावे वाटते, प्रतिमा प्राप्त झालेल्या प्रतिभावानाला स्त्री-पुरुष हा भेद मुळी नसतोच. परकाया प्रवेशाने सर्वांच्या भावना शब्दबद्ध करता येतात, त्या आपसूक भावनांच्या अलंकारांनी सजून धजून काव्यपंक्ती होतात.

या काव्यसंग्रहातून प्रेमाची ही भावना वेगवेगळ्या प्रसंगात आविष्कृत झालेली आहे. रसिकांना वेळोवेळी या प्रीतभावना भावलेल्या आहेत. वाचकमायबाप या काव्यसंग्रहाचं मनस्वी स्वागत करतील असा विश्वास वाटतो.

**- डॉ. मंजूषा कुलकर्णी**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) प्रीतीचा अधीर पूर | ... | ७ |
| २) जरी पर्ण मी होईन सखये | ... | ८ |
| ३) तू सदा माझ्या मनाला भाळवावे | ... | ९ |
| ४) मी गुलाबाचे ग राणी फूल व्हावे | ... | १० |
| ५) सोडवू दे ते तुझे मज गोड कोडे | ... | ११ |
| ६) मधुर माधुरी छबी | ... | १२ |
| ७) छेडिता नव रागिणी | ... | १३ |
| ८) हे स्वप्न सत्यात बस एकदा हो | ... | १४ |
| ९) रम्य क्षण आपुले | ... | १५ |
| १०) म्हणून जीव वेडा तुझ्या त्या अदांनी | ... | १६ |
| ११) तुझा गंध माझ्या गे श्वासी उरावा | ... | १७ |
| १२) गूज आपुले पाऊस होणे | ... | १८ |
| १३) मागणे माझे केवळ इतुके | ... | १९ |
| १४) जपेन तुजला, तुज प्रीतीला | ... | २० |
| १५) सखे, तुज पाहता... | ... | २१ |
| १६) राहीन सदैव कृतज्ञ त्याला | ... | २२ |
| १७) मन सुंदर तर विश्वची सुंदर | ... | २४ |
| १८) पदर अमूल्य ग किमतीला | ... | २५ |
| १९) काही जुळती नाती | ... | २६ |
| २०) हृदयमंजिरी | ... | २७ |
| २१) माझा म्हण गे मजला | ... | २८ |
| २२) सुख म्हणजे | ... | २९ |
| २३) खुलते पुन्हा अबोली | ... | ३० |
| २४) याच डोळ्यांनी जपावे दिव्य लेणे | ... | ३१ |
| २५) क्षणातुन प्रीत ओघळते | ... | ३२ |
| २६) हृदयपाकळी गुलमदनाची | ... | ३३ |
| २७) धुक्याची पहाट तू होऊन यावे | ... | ३४ |
| २८) कसे सांगू रे धुक्या सख्या | ... | ३५ |
| २९) जुळले धागे जुळल्या तारा | ... | ३६ |
| ३०) सहजीवनाची नशा वाढू दे | ... | ३७ |
| ३१) थंडी गुलाबी | ... | ३८ |
| ३२) तुला आठवत आठवत | ... | ३९ |
| ३३) प्रीत धाराप्रवाह | ... | ४० |

३४) रीत प्रीतीची
अबोल तरीही ... ४१
३५) असे वाटते जन्म वहावा... ४२
३६) फिरावा मोऽऽऽर पिसारा... ४४
३७) अशी गावची छोरी गोरी... ४५
३८) अशीच वाढत जावो प्रीती... ४६
३९) जीव लावतो
इतका सखी ग ... ४७
४०) जशी हरवते सखी तू... ४८
४१) मी तुझाच होऊन जातो... ४९
४२) मी जपलेले असे सोहळे... ५०
४३) नको चिडू तू इतकी ... ५१
४४) राजस जवळी येईल ... ५२
४५) सुखाच्या क्षणांना
सहज तोलणे गे ... ५३
४६) तिथे चंदनी भाव उरे ... ५४
४७) नुसत्या तुझ्या पाहण्याने... ५५
४८) तू जणु सुकुमार वेली ... ५६
४९) तुझ्या वाटेवर डोळे ... ५७
५०) मधुमास फुले वनी ... ५८
५१) असे मीलन देखणे ... ५९
५२) आल्हादाचा रंग गुलाबी... ६०
५३) रसिक तो जो जपतो
सुरंगी क्षणाला ... ६१
५४) तुला निरखून पाहू दे ... ६२
५५) तू हो म्हणता फुले मोगरी... ६३
५६) जगणे सुंदर तुजसवे वाटे... ६४
५७) ये ये राणी प्रीत दालनी... ६५
५८) तुझ्या संगतीने ... ६६
५९) मना सांग वेड्या
तुला काय झाले ... ६७
६०) रोज नव्याने
नवी भासशी ... ६८
६१) प्राजक्ता तू आणि ती ... ६९
६२) नव तरुणी प्रियसखी ... ७०
६३) सुकुमार सुमन वेड्या ... ७१
६४) आयुष्याची होऊन बकुळी... ७२
६५) मन जडले प्रिये हे तुजवर ... ७३
६६) चिंब माझे हृदय ओले ... ७४
६७) सखे हृदय प्रीतविभोर ... ७५
६८) प्रिये तू सांग पटलं का ... ७६
६९) ऐक ग प्रिये गाज ती ... ७७
७०) बकुळ नसतो
कधी फितुर ... ७८
७१) तुजला तो काय भिजवील... ७९
७२) सौंदर्याची तू अभिभूल ... ८०
७३) कुंडल घुंगरू
झाले अनावरू ... ८१
७४) मदनदाह लेखणी ... ८२
७५) तुझाच राहीन होऊन ... ८३
७६) हास्य तुझे लाघवी ... ८४
७७) गुलाबपुष्पापरी वहावे ... ८५
७८) असाच राहीन
नजरेतून तव ... ८६
७९) प्रिये शरद पौर्णिमा ... ८७
८०) स्वीकार भावनांचा ... ८८
८१) खुणवत राही
वाट सोनेरी ... ८९



१

**प्रीतीचा अधीर पूर**

सखे साजणी
हाती गंधित वेणी
तुझ्यासाठी गजऱ्याची
गुंफण सुहानी

अशी वाट पाहतेस
माझी तू राणी
नजरेत आपुली
तुझ्या प्रीत गाणी

नाजूक तू तन्वी
मदनरेखा जैसी
प्रिये तू ग माझी
जीवनरेखा ऐसी

स्मिता तू माझी
असे हास्य गोड
सुस्मिता तुजला
कशाची न तोड

अनिमिष वाटते
तुजसी निरखून घ्यावे
नकळता तुला
प्रियतमे मी ग प्यावे

अशी मोऽऽऽहवी
रूपगोडी सुरेख
मनी तार छेडून
जाते तू देख

नको सोडणे
क्षणभरी तुजसी दूर
दाटून ये प्रीतीचा
अधीर पूर

दि. १६/१२/२०२३
रात्री १०.४३ वा.



२

**जरी पर्ण मी होईन सखये**

काय तुझे अंदाज निराळे
पान अधरी तू धरिले कोवळे
उगा मनाला वाटे माझ्या
असे भाग्यवंत मी पर्णची व्हावे

मृदुल कोमलशा ओष्ठ पाकळ्या
स्पर्श तयांचे मी अंगी ल्यावे
मीही कोमल कवळ्या भावना
घेऊन नाजुकले पान व्हावे

तुझ्या संगती कधी न सुके मी
सदा प्रफुल्लित वरदान
तुझ्या श्वासाची मज मिळते बघ
उष्ण हलकीसी एक जाण

सुरम्य ऐशा क्षणात रोजच
विरघळून मी जाताना
रंगरंगल्या स्वप्नामध्ये
तुझ्या सवे मी येताना

किती वाटते सफल जाहलो
जरी पर्ण मी होईन सखये
तुझ्या हातचे अन् देहाचे
अवचित चुंबन घेईन सखये

दि. १९/१२/२०२२
सकाळी ०७.४६ वा.



३

**तू सदा माझ्या**
**मनाला भाळवावे**

चांदण्यांच्या तेजबिंबा पाहिले का
तू तुझ्या त्या तेजकांती चांदव्याला
सांगताना तू मला का मोहवीशी
मी तुझ्या प्रीतीस राणी बांधण्याला

तू सदा माझ्या मनाला भाळवावे
चित्रकाराने कधी त्वा आळवावे
हास्य मोहाचेच जाळे सांग ना गे
मी असे का त्यात स्वतः गुंतवावे

ते तुझे दो बोलके जे नेत्र राणी
रोज माझ्या जीवनाचे छंदगाणी
हारतो मी रोज वेडे ते नशीले
पाहतो मी रोज त्यांना धुंद डोळे

दंतपंक्ती मोतियांची मांदियाळी
भाग्य बिंदीही लकाके जी कपाळी
ओष्ठ दोन्ही पाकळ्या की लोणगोळे
माधुरीच्या गोडव्याचे गोड चाळे

नासिकेची सोनचाफी मोहवेली
चांदणीही चांदव्याची खोवलेली
कर्णभूषा हीरपन्ने टांगलेले
तीळ काळा हा हनूची दृष्ट काढे

तू अशी जी लाजलाजू लाजलेली
गाज माझ्या सागराच्या आतली ही
ये कधी तू जीवनी हो संगिनी गे
अप्सरा ना कोणती, तू भावलेली

दि. १८/०५/२०२२
सायं. ०५.०५ वा.
वृत्त – मंजुभाषी



४

**मी गुलाबाचे ग राणी फूल व्हावे**

का बहाणा गे गुलाबाचा फुकाचा
रंग त्याचा कोणता गे सांग देखा

केवढी ही तीक्ष्ण दृष्टी कातिलानी
मी असा गेलो बुडूनी त्यात राणी

तू बहाणा ना करावा पाहण्याचा
छंद माझा प्रीत ओढी वाहण्याचा

त्या तुझ्या केसात माळू दे मला तू
रूप माझे ते फुलाचे पाह ना तू

शुभ्र वेडा तो गुलाबी होत जाई
जाणली ज्याने मनाची तार गाई

तू तुझ्या त्या स्पष्ट होकारास द्यावे
मी गुलाबाचे ग राणी फूल व्हावे

दि. ३०/०५/२०२२
रात्री ११.३५ वा.
वृत्त- मंजुघोषा



५

**सोडवू दे ते तुझे**
**मज गोड कोडे**

का तुझी ती वाकलेली नजर खुणावे
भेटता तू मजसी माझी खुशी दुनावे

वाटते संसार माझा तू समेटला
आणि त्या डोळ्यात सारा एकवटला

तू अशी अलगद मजसी नयनी बसवते
आणि आपुल्या प्रीतीच्या गावा वसवते

मीही मिटुनी घेतो माझी लोचने ही
तूच तू दिसतेस राणी पाहता मी

हास्य थोडे जे उमटले तव मुखावर
हक्क आहे तो तुझा साऱ्या सुखावर

मी तुझा राहीन प्रियवर संगतीने
प्रीत वेडी मी निभावीन अंतरीने

ही अदा माझ्या मनावर कोरलेली
चांदणीनेही जणु ती चोरलेली

तू अशी लाजून जवळी थांब थोडे
सोडवू दे ते तुझे मज गोड कोडे

दि. ०२/०६/२०२२
रात्री ११.५७ वा.




६

## मधुर माधुरी छबी

नको करू घायाळ असे कितीदा
मीही होतो पुन्हा तुझ्यावर फिदा
कुठून आणल्या अशा अप्सरी अदा
मी मोहामध्ये अडकून पडतो सदा

माहीत असते हास्य तुझे ते मधुर
तरी नव्याने रोज छेडिते सूर
स्वप्ना रमणी जाऊ नको तू दूर
मज प्रेमाला येतो प्रिये ग पूर

मीही विसरतो पुन्हा मला अन्
तुझ्यात गुंतून जातो
कसे दुरावू तुजपासून मी
खेचत जवळी येतो

त्या ब्रह्म्याने सारी माधुरी
तुझ्यातच ओतली
खूण तयाच्या कलाकृतीची
पाहून तुजला पटली

असे वाटते पहातंच रहावे
मधुर माधुरी छबी
मिटता डोळे तूच तू दिसशी
उघडता पुढे उभी

दि. ०३/०६/२०२२
दुपारी १२.१७ वा.



७

**छेडिता नव रागिणी**

तू स्वप्नपरी, की शर्वरी
माझ्या मनाची कल्पिता
तू खरीखुरी, की सुंदरी
कधी मनासी अकल्पिता

त्या मोकळ्या तव कुंतली
का जीव माझा गुंतला
वारा फिरे वेडावुनी
बटसागरी जो झुंजला

ते डूल कानातील वेडे
सांगती मज गूज जे
काजळाची धार करिते
दृष्टीशी हितगूज जे

अंगी ल्येला जो शरारा
स्पर्श रोमांचित जरा
चालताना तो खुशीने
संगती तव बावरा

तो चेहरा मज मोहवी
मज मोहवी पुन्हा पुन्हा
तुज पाहण्याचा रोखुनी
करतो सदाचि मी गुन्हा

देहकांती सोनपिवळी
बांधा नाजुक शेलाटी
लावशील का माझ्या नावे
राणी कुंकुम लल्लाटी

तू कधी जर जीवनी
येशील का मनमोहिनी
सूर जणु भेटे सुराला
छेडिता नव रागिणी
छेडिता नव रागिणी

दि. ०७/०६/२०२२
सकाळी ०७.१४ वा.



८

## हे स्वप्न सत्यात बस एकदा हो

असे स्वप्न आले पहाटे पहाटे
असे रंग दिसले पहाटे पहाटे

तू केशरी काठ पिवळीशी साडी
नेसून दिसलीस हाती फुलारी

मला वाटले शुद्ध सुस्नात तू ती
जणू भेटली मूर्त मजसी तू भक्ती

असा भेटू दे देव आराध्य तुजला
मागेन त्याला तुझे दान मजला

देशील देवा झोळीत माझ्या
हे पुष्प कोमलसे भाग्यात रहाण्या

हे स्वप्न सत्यात बस एकदा हो
ती सात जन्माची साथी सदा हो

दि. १०/०६/२०२२
रात्री ०७.५७ वा.



९

**रम्य क्षण आपुले**

तुझी माझी रात
चांदण खैरात
चमचम चांदण्या
नभी जोरात

गार गार वाऱ्याची
शिरवाई छान
थरथरं इथलं
पान न पान

ऊब मला तुझी,
खरी शेकोटीला भरी
उगाच बहाणा तू
करशील जरी

देखणा ग तंबु,
काळ थोडा थांबू
रानातल्या संगराती,
नाते नवे सांधु

आग मनी पेटली ती,
तुझ्या मना भेटली
एकांत सुंदर,
मग वाट आता कसली

मला सामावून घे,
जरा तू जाणून घे
ओढ, आस, तळमळ,
जिद्द ही मानून घे

रम्य क्षण आपुले,
रंगण्यास थांबले
ये अशी मिठीत
विरघळू जाऊ चांगले

दि. १४/०६/२०२२
रात्री १०.०९ वा.



१०

**म्हणून जीव वेडा**
**तुझ्या त्या अदांनी**

उमलती कुठे मोगरे आठवांचे
कुणाला तरी गजरे ते पाठवायचे

ते गंधाळले ओघळती क्षण सुखाचे
मना अजय छळती किती ते फुकाचे

कधी मोगऱ्या संग गजऱ्यात मरवा
कधी भेटीचा लाभतो धुंद गारवा

तू होशी अबोली बिलगता मला ग
गालावरी रंग लज्जा खुलला ग

असे पाहुनी गजरे मी वेगळाले
कळीचे तुझे पुष्प होणे कळाले

ते गंध माझ्या उराशी प्रकटले
जेंव्हा तुझे माझे क्षण एकवटले

तनु नाजुकी प्रिये गजऱ्यात दिसणे
प्रणयी तुझे लाजुनी मधुर हसणे

म्हणून जीव वेडा तुझ्या त्या अदांनी
फुले साथ करिती तुला त्या मदांनी

दि. १७/०६/२०२२
सकाळी ०७.४२ वा.



११

## तुझा गंध माझ्या गे श्वासी उरावा

तूऽऽ मीऽऽ असे
जवळी जवळी बसू
चांदणे मंद्र थोडे...
निशागाली हसू

तुझा हात माझ्या,
असा हाती यावा
मनाच्या खुशीला न
थारा असावा

ते दोन प्रेमिक नि
सांज निवांत
मनातून तृप्ती,
ऐसा लाभे एकांत

ते बघ चमकले
तिथे दोन तारे
भवताल वाहतील
मदनाचे वारे

तू टेकवावे
तुझ्या भावनांना
निश्चिंत होऊन
अलवार त्यांना

अशा गाठीभेटी
हृदय कोंदणी ग
शशीच्या मनी
रोहिणी चांदणी ग

ते स्पर्श मी
रेशमाचे जपावे
तुला राणी हे
प्रेम माझे पटावे

नको ग कधीही
पुन्हा हा दुरावा
तुझा गंध माझ्या गे
श्वासी उरावा
तुझा गंध माझ्या गे
श्वासी उरावा

दि. १९/०६/२०२२
रात्री ०९.४३ वा.




१२

## गूज आपुले पाऊस होणे

ओल्या चिंब तुझ्या हाका त्या
मनास माझ्या करिती चिंब
तू भिजलेली निथळ चांदणी
ह्दयी प्रीतीचे फुलले बिंब

केशकुंतले थेंब झाडीती
कंकण ओले राग छेडीती
कर्णफुले ओथंबून लोलक
मोत्यांची बरसातही करिती

वस्त्रावरती नदी उतावीळ
जणू सागरासाठी वहाते
मेघांचे ते दान घेऊनी
वर्षाराणी भुईवर येते

त्या अधरांवर थेंब दवाचे
मनास माझ्या उलथून देती
किती राखिले मर्यादेने
सीमा उल्लंघून ते जाती

अशा पावसाळ्यातील सखये
तुझे मुक्त ते भिजून नाचणे
ओल्या ओल्या प्राजक्ताच्या
गंधाला श्वासातून वेचणे

तुझ्या ओलसर घट्ट मिठीतून
कधी न मी बघ विलग हा व्हावा
तुझ्याच सोबत पाऊस वेडा
वेडा हा तव प्रियकर व्हावा

चार मास भारावून जाणे
पावसातले ओले गाणे
तू मी दोघे आणिक पाऊस
गूज आपुले पाऊस होणे

दि. ०६/०७/२०२२
सकाळी १०.४४ वा.



१३

## मागणे माझे केवळ इतुके

प्रिये ग राणी तुझ्याचसाठी
मी फुलांचा असा गालिचा होईन
आणि मनातील पराग माझ्या
तुझ्याच हृदयातळी मी वाहीन

किती असू दे दुःख खडक ते
महाभयंकर आणिक रुक्ष
तुझ्या पावलांसाठी मृदुल हे
मार्ग बनविण्या राहीन दक्ष

स्पर्श तुझा तो कोमल होऊन
अंगी माझ्या थरथर येईल
फुलाफुलातील नवथर कोशी
पुन्हा पुन्हा मी जन्मा घेईन

अशक्य सारे करीन शक्य मी
प्रीत तुझी जर मिळेल मजला
तुझ्या जीवनी देत सुखाची
सदा सावली वचन हे तुजला

रम्य सुरेखशी आपुली जोडी
विराण वनही तुडवीत जाईल
एक नव्याने रेशमी अंकुर
वळणावरती घडवीत जाईल

होत अचंबित पाहत राहतील
लोक कौतुके या जगतातील
धडधडते जे फिदा तुझ्यावर
हृदय काढीले बघ हातावर

पुष्प जणू मन कोमल जितुके
प्रेमासाठी तलमही तितुके
कधी न सोडून जावे तू मजला
मागणे माझे केवळ इतुके
मागणे माझे केवळ इतुके

दि. ०६/०७/२०२२
रात्री ०९.०९ वा.



१४

## जपेन तुजला, तुज प्रीतीला

अंतिम शब्द तुझाच असेल हे
वचन प्रेमाचे घे माझे
निर्णय जे ही असतील ते मी
स्वीकारेल हेच प्रेम माझे

आदर राखीन भावनांचा तुज
तुलाच सखी सचिवा मानीन
तुझ्याचसाठी सुखे निरंतर
पायावरती सुखे आणीन

जपेन तुजला, तुज प्रीतीला
सहजीवन आपुले फुलवीन मी
आनंदाने तुला प्रियतमे
बाहू झुल्यावर झुलवीन मी

तुझ्या पावलांवरती पाऊल
टाकीत चालणे मज मंजूर
अनुगमनाने तुझ्या पाठीशी
खंबीर राहणे मज मंजूर

नजरेमधल्या तुझ्या खुणांना
सहजी ओळखून वागेन मी
दिल्या घेतल्या त्या वचनांना
स्वप्नातही प्रिये जागेन मी

दि. ०६/०७/२०२२
रात्री ११.०० वा.



१५

**सखे, तुज पाहता...**

सखे, तुज पाहता निरखुनी, जीव वेडावतो
साथीला पावसाळा, शीळही घालतो

ते तुझेऽऽ केस कुरळे मोकळे, जीव गुंतून जातो
अर्ध उघडल्या त्या ओठांतुन, शब्द अडकून राहतो

कानातलेही डोकावती बघ, वाकून बघण्या तुला
स्पर्श गालाचा त्यांना होता, झुलून जाती झुला

ती डोळ्यातील धार काजळी, मेघांना भुलवीते
दाट पापणी मज आशेला, हिंदोळे झुलवीते

तुज भुवयीच्या रम्य कमानी, इंद्रधनू भासती
चंद्र सूर्यही बिंदी होऊन, भाळावर हासती

सखे पाहता तुला पुन्हा मी, युवा नवा होत जाई
तुला भेटण्यासाठी मनातुन, जागे पुन्हा नवलाई
जागे पुन्हा नवलाई...

दि. १४/०७ २०२२
सायं. ०६.५७ वा.



१६

## राहीन सदैव कृतज्ञ त्याला

किती सुंदर तू रमणीया
तुझी कामना कमनीया
मुखमांडल हे होई विराजित
होईन मी ग कितीदा पराजित

इतके गहिरे गूज लपविले
लपवून ठेव प्रिये तू डोळे
वरती सुंदर गर्द पापण्या
जणू सावधशा दृष्ट झाकण्या

दो भुवयांच्या वेशीवरती
स्वप्नांची मज होते गर्दी
आणि मध्ये त्या कुंकुम टिळका
मज येण्याची लागे वर्दी

कळी सुंदरशी सरळ नासिका
मोहक जगण्याची ती श्वासिका
त्यावर नथणी गोल बोलते
ऐश्वर्याचे गूढ खोलते

कोमल कवळ्या ओष्ठ पाकळ्या
मदनफुलांचे दल त्या चांगल्या
त्यावर लाली अशी विराजे
मक्तेदारी प्रियाची साजे

आभूषण मोजकेच पुरती
तरी कंकण हे गजबज करिती
मुक्त सोडले जे तू कुंतल
त्यातच माझा जीव हा गुंतल

असा टेकवला कर तू माथी
भाग्य दे ना ग माझ्या हाती
लपवून ठेवीन दडवून ठेवीन
मुखचंद्राला हृदयाकाशी

मुरके मुरके स्मित हे हसरे
पाहणारा बघ स्वतःस विसरे
अशी मोहिनी मनास घालून
खुशाल जातेस निघून चालून

नको एवढे छळूस मजला
शपथ प्रीतीची राणी तुजला
एक नजर बघ तुझी मारते
तूच पुन्हा त्यातून तारते

पाहत राहीन पाहून तुजला
विसरून जाईन या जगताला
अशी कृती रेखीव आकृती
घडविली म्हणुनी कृतज्ञ त्याला
राहीन सदैव कृतज्ञ त्याला

दि. १८/०७/२०२२
रात्री ११.०२ वा.



१७

## मन सुंदर तर विश्वची सुंदर

तू सावळीशी सुंदर कृष्णा
वाढविशी मज हृदयी तृष्णा
रंग रंगाचे सालस देणे
श्रीरंगाने सावळे होणे

जरी राधिका नितळशी गोरी
सावळ्याने तिज केली चोरी
रंगांचे ते रंग वेगळे
कुणा नशिबी रंग सोहळे

वरच्या रंगा खाली नितळसे
किती रंगांचे भरले कळसे
अणुरेणूंचे रंग कोणते
मन चित्ताचे रंग जाणते

अंतरंग हे जाणून घेता
आत्मरंगी तो ईश्वर कर्ता
तुज सौंदर्यामधे दिसे मज
तो विश्वाचा बघ निर्माता

स्वच्छ भावना सुंदर हास्य
अंतरातले मोहक लास्य
भाग्य उजळते शुभसंगिनी
रंग तुझा मज घाले मोहिनी

तेज चकाके तव भाळावर
आस लकाके मुखचंद्रावर
तुझे वागणे किती मधुर ग
असा भाळलो प्रिये तुझ्यावर

रंग प्रीतीचे लोभस सुंदर
रंग मदनी हे अजब कलंदर
तुझ्या रूपाचे शुभ्र चांदणे
मन सुंदर तर विश्वची सुंदर

दि. २०/०७/२०२२
रात्री १०.५५ वा.



१८

## पदर अमूल्य ग किमतीला

सहज बांधीशी अंबाडा
तो सैल पदर तुज खांद्याला
आखीव रेखीव अंगांगे तव
नजर न लागो बांध्याला

वाऱ्यावरती खेळून दमला
बिलगून जाई पदर तुला
दिसभर कितीदा हाती तुझ्या तो
लाडिक चाळे कदर तुला

घट्ट ओढुनी कटीशी खोवुनी
लागशी लगबग कामाला
येत डोईवर राखणदार तो
सदैव अब्रू मानाला

कधी घडीचा शिस्तबद्ध तो
कधी टाकला एकेरी
कधी सुलटा तर कधी उलटा तो
प्रकार नाना पाहेरी

कलाकुसरीचा मोर नाचरा
वेलबुट्टीही सांभाळी
कधी खसखस बघ पिकते हसरी
पदर आळी मिळी गुपचिळी

घ्यावी ओटी भरून त्यातची
त्यातच संसाराची फळे
बाळ पोसणे त्या आडूनच
सौख्य मायेचे त्यात कळे

चुका झाकीशी पदराखाली
भावसरिताही वाहे उरी
काया जर्जर झाली तरीही
वात्सल्याची ऊब खरी

तुझे शील सांभाळून राही
कायम सेवा दिमतीला
सोबत करतो क्षणाक्षणाला
पदर अमूल्य ग किमतीला

दि. २२/०७/२०२२
सायं. ०६.२० वा.



१९

## काही जुळती नाती

आज पाहिले नवतरुणीला
सहज उभे असताना
रूप देखणे रती सारखे
कामदेव नसताना

उंबरठ्यावर तारुण्याच्या
मोहक रूप तियेचे
लावण्याच्या वार्ता गेल्या
नाव ओठी हे जियेचे

वस्त्र आधुनिक हास्य पुराने
डोळे लखलखणारे
केस मोकळे वाऱ्यावरती
धुंद मुक्त उडणारे

तारुण्याच्या भरात युवती
भरात ऋतुही आला
मनात कुठूनसा सोनचाफ्याचा
सुगंध दरवळू गेला

क्षणी वाटले माझी व्हावी
झणी स्वप्नं विरलेले
एक झलक ही पाहून कसले
वेड मना पांघरले

अशा कितीशा युवती कलिका
मनात उमलून जाती
एक क्षणाची तरीही गोंडस
काही जुळती नाती

दि. २९/०७/२०२२
दुपारी ०१.११ वा.



२०

## हृदयमंजिरी

सौंदर्याची अत्तरकुपी तू
धुंद करिशी मज जिवा
जितका येतो जवळी तितक्या
मोहरती जाणिवा

बुडतो किती ते मला न ठाऊक
खोल नेत्र सागरी
मदहोशीच्या भरून वाहती
ओसंडून घागरी

रूप म्हणू की रतीस्वरूपा
यौवन देवी कुणी
रेखीयले तुज अतीव कोरीव
निर्माता तो गुणी

ओष्ठ दळे की लावण्याची
केलेली स्वाक्षरी
वर नासिका इतकी सुंदर
नजर खिळते त्यावरी

गर्द दाटसर काळ्या कमानी
भ्रूकुटीच्या वाकल्या
नयनांवरती देत पहारे
पापण्याही झाकल्या

भुऱ्या बाहुल्या कज्जल धारा
लोचन रंगही प्यारा
किती मोहिनी निर्मळ पसरे
प्रभाव पडतो गहिरा

असे वाटते हृदयमंजिरी
कुणा भाग्यवंताची
पुण्य फळावे रत्न मिळावे
तेव्हा तू हो त्याची

दि. ०५/०८/२०२२
रात्री १०.४१ वा.



२१

**माझा म्हण गे मजला**

एक चेहरा रुळतो आहे
मनी कधीचा वेडा
कितीही म्हटले विसरून जावे
तरीही त्याचा गराडा

साधा साधा चंद्र वाटतो
गगनातुन फिरणारा
अमोल त्याचे किती चांदणे
आल्हादी उरणारा

डोळे निरागस भाव कोवळे
मुखी भावना दाटून
कधी स्वप्नांचा घेऊन मेळा
हाती ये माझा वाटून

तोच चेहरा दिसे पुन्हा मज
तरळून जातो कधीही
बट ती वेडी करते पागल
आजही आणि आधीही

अधरांवरती तिच्या अबोली
तरीही खुलते काही
सांगा कसे मी विसरू डुल ते
मजला विसरत नाही

इवली नाजूक टिकली टिकली
दो भुवयांच्या मध्ये
हसू की नको जणू विचारे
हृदय संभ्रमामध्ये

काय सांगू मी प्रिये तुला बघ
घायाळ आजही पुरता
सखे विचारून भंडावती मज
कृश तू कैसा न झुरता

कधी एकदा नजर भिडावी
काळीज कळू दे तुजला
अलगद माझ्या मनात यावीस
माझा म्हण गे मजला

दि. ०८ /०१/२०२३
रात्री १०.१६ वा.



२२

**सुख म्हणजे**

फुलांच्या गाभ्यावर
तुझे माझे पाय
सुख म्हणजे याहून ग
असेल तरी काय

हिरवे हिरवे रान डोले
हिरवीगार नाती
निळ्या आकाशाशी
हितगुज करे माती

थंड गार वारा
प्रकाशाचा डेरा
पहाटेला मारू ग
छान सखे फेरा

तुझ्या माझ्या रंगाला
दृष्ट न लागावी
म्हणून काळी तीठ थोडी
पंखाने मागावी

तुझ्या माझ्या प्रेमाचे
घरटे किती पक्के
किलबिल पिलांची
स्वर्गसुखे फिक्के

नितळ नितळ आभाळाच्या
मायेची सावली
वसुंधरा हिरवीगार
दाण्याला पावली

आता कुठे माघार
घ्यायचीच नाय
सुख म्हणजे याहून ग
असेल तरी काय

दि. १६/०८/२०२२
रात्री १०.४३ वा.



२३

## खुलते पुन्हा अबोली

घट्ट ओवला दाट केवढा
गजरा अबोलीचा हा
न बोलणाऱ्या फुलांचा वाचा
नजराणा ओळखीचा

डोळ्यास दिसती छान
दोऱ्यास बिलगलेल्या
हळुवार प्रीत नाजूक
मांडीत बोलल्या या

ना गंध ना सुगंध
आहे जरासा हळवा
माझ्या प्रियास कोणी
अबोल भाव कळवा

हा रंग भावतो ना
देतो मना उभारी
किती शांत सात्विकाची
देते ही साक्ष सारी

दिसता अशी अबोली
तू आठवे मला ग
द्यावासा भेट म्हणुनी
गजरा असा तुला ग

मीही अबोल होतो
तू जाण बोल माझे
डोळ्यात वाच राणी
सारेच प्रेम माझे

गजरा निमित्त होते
हसते उगाच गाली
फुललेली प्रीत पाहून
खुलते पुन्हा अबोली

दि. १२/०८/२०२२
रात्री ०८.२६ वा.



२४

## याच डोळ्यांनी जपावे दिव्य लेणे

बावऱ्या डोळ्यांचीऽऽ प्रीत तुझी
तुज एकटक न्याहाळण्याची रीत माझी

तू का लाजते इतकी अजुनी मला न माहीत
लज्जा शोभते परि तुला हे मलाच माहीत

त्या डोळ्यांच्या सागरात मी गहिरा बुडतो
पापण्यांच्या तव पंखांवर अलगद उडतो

वाटते मी या डोळ्यांना चुंबून घ्यावे
लाघवी तुज प्रेमामध्ये रंगून जावे

शृंगार खुलतो बावरण्याने अधिकच आपुला
ठेव सांभाळून स्वप्नी प्रणय हा आपुला

शपथ बावऱ्या या डोळ्यांची आहे तुजला
राहू दे ना रात्रंदिन गे यातच मजला

तू वाट माझी पाहशी आतुरतेने
याच डोळ्यांनी जपावे दिव्य लेणे

दि. २४/०८/२०२२
सकाळी १०.१५ वा.




२५

## क्षणातुन प्रीत ओघळते

सुखी संसाराचे हे गमक ग
तुझ्या मागुनी चालावे
संभाळीशी तू घरादाराला
कौतुक शब्द मी बोलावे

इथे पहा हा सिंह वनाचा
राजा शोभून दिसतो ना
तोही सिंहिणीपाठीमागून
प्रेमापायी असतो ना

वनात हिंडून राज्य टिकविणे
काम त्याचे ते जोखमीचे
तरीही अधिकच निभावते ती
छाव्यांना सांभाळून जे

शक्ती तियेची माहीत त्याला
सलाम करतो तोही भला
तिच्या रक्षणासाठी मागे
चालून आदर्श चांगला

नाही तिलाही गर्व कोणता
साथी सोबत तिच्या सदा
पुढे चालते बिनदिक्कत ती
नाही काळजी चिंता बघा

असे सुखाचे चित्र देखणे
प्रतिबिंबातही तेजाळते
असे वाटते क्षण थांबावे
क्षणातुन प्रीत ओघळते

दि. ३०/०८/२०२२
सकाळी ०९.३४ वा.



२६

## हृदयपाकळी गुलमदनाची

स्वप्नसरोवरी उमलून आल्या
कितीतरी लोभसशा कमलिनी
पुष्प देखणे रंग गोजिरे
दृष्टीची जणु बंदी मोहिनी

रम्य जळातील रमणी सुंदर
नजर पोचते खुलल्या तिथवर
असे वाटते फुलल्या कामना
आयुष्याच्या अतिमनोहर

वर आकाशी इंद्रधनुचे
रूप देखणे कमानीतले
मिळते जुळते रंग फैलवीत
स्पर्धा चाले चित्र आतले

कमळे गुलाबी, जल गुलबक्षी
आकाशातून गुलाल नक्षी
जगणे गुलाबित गुलशन गुलवर
गुलबंदीची नजर गुलाक्षी

त्यात तरुणी ही मूर्त गुलाबी
पाठमोरुनी गुलबदनाची
तिचे गुलमयी छत्र गुलालस
हृदयपाकळी गुलमदनाची

दि. १३/१०/२०२२
सायं. ०६.५० वा.

## २७
## **धुक्याची पहाट तू होऊन यावे**



धुक्याची पहाट तू होऊन यावे
मी तुझ्या धुंदल्या क्षणात
मजला झोकून द्यावे ।।

मी तुला पांघरून तुझ्यात दडून गुडुप होता
तू ऊब वेगळी होत दिलासे देऊन जावे
धुक्याची पहाट तू होऊन यावे ।।१।।

मी बाहेर बघणे सोडून सारे आत डोकवून
मलाच मजला लाभत जाणे असे घडावे
धुक्याची पहाट तू होऊन यावे ।।२।।

जे दूरदूरचे नको दिसू दे स्पष्ट ते सारे
मी तुला जवळून निरखून मुरवून मिरवून घ्यावे
धुक्याची पहाट तू होऊन यावे ।।३।।

मी असा बुडावा जणू युगाची निवांत प्राची
समजून उमजून तुझे गीत मी छेडून जावे
धुक्याची पहाट तू होऊन यावे ।।४।।

ते मंतरलेले क्षण सुंदरसे ओंजळीत अन्
ओंजळ दवात बुडून धूसर सडे पडावे
धुक्याची पहाट तू होऊन यावे ।।५।।

दि. १०/११/२०२२
सकाळी ०९.३४ वा.



२८

## कसे सांगू रे धुक्या सख्या

धुंद धुंदला मोही प्रवास
कप चहाचा पसरे सुवास
हाती हात प्रिये तुझा असा
सत्य भास की भास आभास

हिरव्या हिरव्या पल्लवराण्या
नव स्वप्नांनी खुणावती
एक कल्पना स्पष्ट होतसे
अन्य सुखाने दुणावती

धुक्यात तू ती उभी शहारून
ये राणी तू कवेत ये
मिठी रेशमी तलम मोगरी
अत्तर विरते हवेत जे

दवबिंदूंची गळ्यात माळ नि
तनुवर फुलतील प्राजक्त
तू मी, मी तू जन्मोजन्मी
परस्परात ग आसक्त

कसे सांगू रे धुक्या सख्या मज
क्षण सुंदर तू करिशी बहाल
तुझ्यामुळे मी प्रियतमकोशी
भ्रमरासम बंदिस्त कमाल

दि. १०/११/२०२२
सकाळी ११.३० वा.



२९

## जुळले धागे जुळल्या तारा

भरून आल्या आभाळाच्या
मनात काही
मनात भरले आभाळही मज
प्रिये तू पाही

दाटदाटुनी ढग हे भरले
कोसळण्यासाठी
हृदय तुडुंबही माझे राणी
तुज प्रीत देण्यासाठी

हात हाती घेऊन तुझा
आश्वस्त किती झालो
किती दिसांनी प्रियतमे आपण
असे जवळी आलो

उंच नभाशी पोचल्या आशा
आपुल्या सहजीवनाच्या
जुळले धागे जुळल्या तारा
दोन प्रेमी जीवांच्या

जगण्यासाठी औषध तू मज
रहा सदा संगती
तुला पाहता विसरून सारे
चालतो सप्तपदी

तुझ्याविना मी अपूर्ण आहे
घे इतुके जाणुनी
प्रिये लाडके जीव ओवाळीन
तुज पायी स्वर्ग आणुनी

एकरूप होऊन जाऊ चल
सुंदर नाते जपू या
परस्परांच्या प्रेमसुखातच
भारले जीवन जगू या

दि. १६/११/२०२२
सकाळी ९.४५ वा.



३०

## सहजीवनाची नशा वाढू दे

कितीतरी दिवसात मिळाला
संग निवांत प्रियेचा
किती बोलणे मनात होते
शब्द सुगंध तियेचा

हात हाती अवचित घेऊनी
क्षण मी जणू गोठविले
सारे भाव ते न बोलता मी
हृदयाने पाठविले

नजर तिची झुकलेली खाली
साद घालिते मजला
उचलून निमुळती सुंदर हनुवटी
पहातच रहावे तिजला

क्षण सोन्याचे भरभरून मी
वेचित जातो ऐसे
जगण्यासाठी किती जरूरी
प्राणासम ते तैसे

देवा जुळू दे सदा मने ही
आमुची एकदिलाने
सहजीवनाची नशा वाढू दे
वाढत जात्या वयाने

दि. १६/१/२०२२
दुपारी ०३.१४ वा.

३१

## थंडी गुलाबी

थंडी गुलाबी
नशा ही शराबी
तुझ्या मिठीतून राणी
गंध हो शबाबी

थंडी गुलाबी
अंग अंग शहारले
आपसुक मजला प्रिये
जवळी तू असे धरले

थंडी गुलाबी
कोशात बंदी
सुटू नको देऊ देवा
कधी ही पाबंदी

थंडी गुलाबी
मी साठवतो आहे
मोहिनी कवेत माझ्या
स्वर्ग आठवतो आहे

थंडी गुलाबी
ऋतू आवडीचा
कसा बांधून मी ठेवू
समय सवडीचा

थंडी गुलाबी...

दि. १७/११/२०२२
सकाळी १०.०२ वा.



३२

**तुला आठवत आठवत...**

काय माहित बकुळी
तुला पाहिलं की आठवतं
ते शाळेतलं पहिलं प्रेम
मनाला पुन्हा पुन्हा तिथंच पाठवतं

शाळेच्या बाहेर
तुझा बहर सडा पडायचा
त्याचा तुझा माझा पाय
नेमका तिथंच अडायचा

मग काय बहाणा आमचा
तुला वेचण्याचा
तुला ओंजळभर भरत
गोड क्षणांना खेचण्याचा

वहीतून पुस्तकातून जायचं मग
एक फुल प्रीतीचा संदेश घेऊन
तेही अबोल मीही अबोल
अबोल काही हृदयाच्या तळातील देऊन

शाळा संपली ...शाळा संपली
आयुष्याने कितीतरी वळणं घेतली
पण तुला सांगू..
आजही माझ्या काळजाच्या वहीतली
ती नाजूक बकुळफुलं मी वेचली

का कुणास ठाऊक
ती कवळी कवळी अंकुरलेली प्रीत
ती ठाऊक नसलेली वेडी रे रीत
आजही मधूनच डोकावते अन
मी पुन्हा शाळेच्या अंगणात तुझी होते
मी पुन्हा बकुळी वेचते तुला आठवत
आठवत..

दि. २८/११/२०२२
सकाळी ०८.२४ वा.



३३
## प्रीत धाराप्रवाह

सळसळ धबधब असा कोसळे
किती जन्माची आस
स्वर्गामधली जलधारा की
सुख फेसळते भास

कसली ओढ ही उगाच आतून
तुला भेटण्याची
असाच वाहत येतो निर्झर
नशा वाहण्याची

उंचावरूनी झोकून देऊन
सोडून जलदेहा
मीलन धरेशी नाही आजचे
मनीषा ही नेहा

असाच उसळून येतो हृदयी
सागर फेसाळून
तुला भेटण्या जीव हा आतुर
भावना ये घुसळून

कणकण अंतर्मनही भिजते
उतावीळ परिवाह
अशी भेट नित आवेगाची
प्रीत धाराप्रवाह

दि. ०७/१२/२०२२
सकाळी ०७.५६ वा.



३४

## रीत प्रीतीची अबोल तरीही

तुझ्या नि माझ्या प्रेमामध्ये
आकाशही बघ बुडून गेले
सूर्य बुडाला मिटले लोचन
जळही सारे गढून गेले

अशी उचलता तुझी हनुवटी
तू झुकलेली अवचित खाली
त्या लज्जेच्या कोमल पडद्या
सारून किमया केवढी झाली

आज सुखावून गेले बिंब नि
प्रतिबिंबाला उधाण आले
तुझ्यासवे मी असता राणी
गंधफुले मनभावन झाले

शब्दही नाही बोललो जरी
उमटून गेल्या साऱ्या भावना
स्पर्शामधले धागे विणले
लुभवून गेला वाराही मना

अशी सांज बघ इथेच थांबून
तुला नि मला कवेत घ्यावी
रीत प्रीतीची अबोल तरीही
आसमंत बोलून ती जावी

दि. २९/१२/२०२२
सकाळी ०७.३४ वा.



३५

**असे वाटते जन्म वहावा**

किंचित उघडे मुख सुंदरसे
शब्द लाघवी देतील
क्षणात मजला तुझ्या ह्दयी गे
सखे साजने नेतील
आणिक बुडवून सखये देतील ...

ओष्ठ पाकळ्या मोहक कलिका
रंग त्यावरी चढला
त्या नाजुकशा रेखा उभटशा
चित्ती कोलाहल जो उठला
माझ्या चित्ती कोलाहल जो उठला...

आतून डोकावून पाहती
आखीव रेखीव दशन
रंग शुभ्र पांढरा तयांचा
कसे सांभाळावे मन
चंचल वेडे हे मन.

करतो त्यावर कहर केवढा
अवखळ हनुवरी तीळ
तनमन सारे प्रियानुरागे
कण कण ऊतावीळ
चित्ता पडतो माझ्या पीळ...

सुंदर रेखीव सरळ नासिका
जणु कळी चाफ्याची
एक चांदणी रुळू दे नथनी
कला कुसर उफ् त्याची
तू तर कला कुसर ग त्याची.

आता माझे काही ना खरे
नयन शराबी तेजल
राजीवलोचन तू अभिमोहन
बुबुळे केवढे सेजल
पाणीदार सुंदरसे नेत्र, इवले इवले
सरोवर...

दृष्टी जादूगरीच करते
खिळवून ठेवते मजला
घट्ट दाटसर कज्जल रेषा
जणू बंधने मजला
कोंडून घेईन त्यातच स्वतः..

अन् भुवयांच्या उंच कमानी
डौलदार धनुषाच्या
पुन्हा चंद्र तो होऊन कुंकुम
भाळी उगवे उषा त्या
वेचून हास्याच्या कळ्या...

अस्ताव्यस्त बटाही रूळती
सुंदरतेच्या वर्धक
लावण्यच हे अद्वितीय तव
प्रिये कोणी ना स्पर्धक
धडधड ही संवर्धक ...

असे वाटते जन्म वहावा
केवळ तुज निरखण्या
एक नजर तुझी पडू दे इकडे
उभारी येईल जगण्या
राणी आवश्यक मी तगण्या...

दि. १७/०१/२०२३
सकाळी ०८.५६ वा.



३६

## फिरावा मोऽऽऽर पिसारा

कुणाच्या आठवांनी हो
कुणाला दाटवे यावे
कुणाच्या स्पर्शकलिकांचे
मोहुनी ताटवे व्हावे

कुणाच्या आठवांनी मग
कपाळी रेघोट्या उठती
कुणाच्या तर स्मृती ऐशा
आठ्या भाळावर उमटती

कुणाच्या आठवांच्या धारा
नित बरसून जातात
कुणाच्या गोड सहवासी
जन्म हरखून जातात

कुणाच्या आठवांनी ते
पसरते गर्द धुके धूसर
कुणाच्या शब्द माधुरीत
दिलावर घडते कलाकुसर

कुणाच्या आठवांचे हे
विमोही गाठोडे मोठे
उघडता संपतच नाही
थांबणे होईल मग कोठे

कुणाच्या आठवांचे हे
अनामिक ओझे कोणाला
न जाते दूर अन छळते
कोठडीत जाळते जीवाला

कुणाच्या आठवांचा हा
मनासी केवढा सहारा
आठवून आठवांना त्या
फिरावा मोऽऽऽर पिसारा

दि. ३०/१२/२०२२
सकाळी ०९.२१ वा.



३७

## अशी गावची छोरी गोरी

वय सोळावे तियेचे असे
लाज तरुण जाहली
चाळा चालतो ओढणीसंगे
मनी प्रीत जागली

डोळ्यातून ती झळकून गेली
तिच्या मुखी विलसली
कुण्या भाग्यवंतांच्या हृदयी
तिची आस उमलली

रानवारा जो करितो गुंजन
झुकलेला मुखडाही
फिका वाटतो तिच्या पुढती तो
चांदव्याचा तुकडाही

नसे माहिती शृंगाराची
साधी राहणी तिची
फुले उधळती सुगंध पायी
मादक पाहणी तिची

कधी न विसरेन तिला जन्मी या
न बोलता बोलणे
अजून भाळतो तिच्या अदांवर
तिच्या गावी चालणे

अशी गावची छोरी गोरी
पोरी चोरूनी गेली
एकच होते काळीज धडधड
सदा पेरूनी गेली

दि. ०८/०१/२०२३
रात्री १०.३१ वा.



३८

## अशीच वाढत जावो प्रीती

एकाच दुशालीत सखी आणि मी
ऋतू सोहळे किती नामी
अजून रुजते प्रीत खोलवर
ती, शीतलता आणिक मी

श्वासासंगे श्वास चालती
धडधड गाते सूर नवे
पेशीपेशीमध्ये जिवलग
जिवा दिलासे असे हवे

स्पर्शामधुनी हर्ष बोलती
ऊब आगळी सुखावते
साथी माझ्या संगे असता
विश्व जणू मज कवेत ये

शब्दांची ना गरज भासते
दृष्टीमधले संवाद
नाद तरंगत येती आपसुक
प्रेम चालते अनुनाद

असा थंडीचा ऋतू हिवाळा
सुखावून जातो मजला
जितका जवळी जातो प्रियेच्या
कळून जातो मी तिजला

अशीच वाढत जावो प्रीती
दर संवत्सर दर वेळी
समाधानाची चरम गाठू दे
क्षणोक्षणी मग त्यावेळी

दि. २१/०१/२०२३
रात्री ०९.४३ वा.



३९

## जीव लावतो इतका सखी ग

अडखळलो मी तुला पाहुनी
तू रमलेली संसारी
नटलेली तू सजलेलीही
सजनासंगे दिसशी खरी

अजूनही मी तिथेच आहे
प्रीत आपुली सांभाळीत
कुणी न मजला तसे वाटते
जसे तू माझ्या मन आळीत

निरखत होतीस म्हणे परतुनी
पाहून काही काळ मला
सांगून गेले दोस्त बिचारे
वाटे ती न विसरली तुला

कशा मी विसरू प्रिये त्या भेटी
आणाभाका सत्य खऱ्या
तुझ्यात गुंतून इतका आहे
फिक्या तुजपुढे मजसी पऱ्या

अजूनही का मला वाटते
थांबशील तू मजसाठी
अशीच येशील अवचित आणिक
मीही वेडा तुजसाठी

नसे परी हे खरे प्रियतमे
समजावीन मी पुन्हा मना
पुन्हा त्या मंतरलेल्या वेळा
पुन्हा भळभाळुनी ये जखमा

नाईलाज का तुझा जाहला
समजून घेईन या जन्मी
परतून पाहून सांगितले तू
तुझ्या मनी अजूनही सखे मी

असाच मरेन नाही चिंता
प्रेम सखोल हे माझे फार
फक्त विनवतो आठव मजला
वाट पाहते तुझी हे दार

एक नजर ही संजीवनी मज
काही काही नको मला
जीव लावतो इतका सखी ग
कसे सांगू मी शब्दे तुला

दि. २६/०१/२०२३
रात्री ०९.३४ वा.



४०

## जशी हरवते सखी तू...

जशी हरवते सखी तू स्वप्नी
मीही तसे हरवावे
तुझ्यात मजला विसरून राणी
प्रेमाक्षर गिरवावे

किती गाढ बघ असते प्रीती
सारे मीपण जाते
साथीदाराच्या गुणात मिसळून
गीत नव्याने होते

असे वाटते संपू नये हे
क्षण सोन्याचे सारे
आठवणींच्या पेटाऱ्यातील
चमचमणारे तारे

हरवून मजला गवसून जाते
प्रीत नवी जगण्याची
आणिक जैसी ठाऊक अंकुरा
रीत नवी रुजण्याची

तू माझ्यासाठी कीती त्यागी
सारे सहजी सोडून
अलगद कैसे कितीक नाती
देतेस प्रिये तू जोडून

म्हणून वाटते मीही जावे
तुझ्या गोडवी विरघळून
खरेच फळणे होते जेव्हा
सुमन हे जाते गळून
जेव्हा सुमन हे जाते गळून

दि. २३/०१/२०२३
सायं. ०७.१० वा.



४१

## मी तुझाच होऊन जातो

छवी प्रसन्न भुलवी मजला
कसे सांगू प्रियतमे तुजला
मज मना उभारी मिळते
तुज पाहून क्षणाक्षणाला

ते निखळ हासणे सुंदर
ते झुकले नयन कलंदर
होडी ही जीवाची वेडी
तिज तुझे लाभू दे बंदर

हेलकावे बसतील काही
मी तगवून ठेवीन प्रेम
परि तुझा फळू दे राणी
मजवरी एकदा नेम

त्या केसातून मोकळ्या
मी स्पर्श मृदुल होईन
त्या ओठाच्या पाकळ्या
मी हर्ष मधुर होईन

तू तन्वी किती नाजूकशी
मी भाळून वेडा होतो
तुज पाहून पुन्हा पुन्हा ग
मी तुझाच होऊन जातो
मी तुझाच होऊन जातो

दि. २९/०१/२०२३
सकाळी ०८.०८ वा.



४२

**मी जपलेले असे सोहळे**

धुंद गारवा हवेत सारा
स्वप्ने हुडहुडली
पहाट वेडी दवात न्हाऊन
केवढी कुडकुडली

भल्या सकाळी तुझी आठवण
हृदयातून जागे
मंद दरवळे जाई जुई ही
मोगरी का लाजे

असे वाटते पडून रहावे
बिछान्यात कितीही
प्रीत शाल ओढून प्रिये तव
जाणवे मज ऊब ही

ऋतू वेगळाले हे सारे
खासमखास कसे
थंडी गुलाबी हवा शराबी
मदहोश गारवा दिसे

मी जपलेले असे सोहळे
कळतील प्रिये तुजला
रोज बोलते गूज सांगते
गोड हवा मजला

दि. २४/०१/२०२३
सकाळी १०.१३ वा.



४३

**नको चिडू तू इतकी**

ते रागावून ओठ वळविणे
किती जीवघेणे ग
डोळ्यांमधुनी अंगारांचे
जणू लाल तळपणे ग

शब्दही नाही बोलशील पण
राग अनावर होईल
आतल्या आतची धुमसत राहून
भडका उडून जाईल

नजरेमधले अनोळखीपण
मला केवढी शिक्षा
जन्मोजन्मी करतो की ग
तुझी मी राणी प्रतीक्षा

आज एकदा उशीर झाला
नको चिडू तू इतकी
जातीच्या सुंदरास काय ग
रागातही गोड तितकी
तू दिसशी, रागातही गोड तितकी

दाबून आकसून धरल्या ओठा
सोड जरा मोकळे
निदान स्मित तरी कर की थोडे
प्रीत तुझी मज कळे

मी साठवतो तुझे हासणे
माझ्या स्मृती कोषातून
ओढवून मज नाही घ्यायचे
रोष आणखी रोषातून

चुकलो समजून घेशील आता
नजर मारते भाले
एकदाच तू प्रेमभरे पहा
मी तुझ्या आज्ञेतच चाले
सखी ग, तुझ्या आज्ञेतच चाले

दि. ३०/०१/२०२३
सायं. ०५.३५ वा.



४४

## राजस जवळी येईल

चहा पिते की प्राशिते मजला
प्रिये नजर मादक
थंडीमधली नजर गरम की
मदनबाण हे भेदक

आधीच आहे अबोल मी ग
तुझी नजर बोलकी
चाल बोलते ढंग बोलती
तू शब्देविण बोलकी

काय मनीचे तुझे मनसुभे
जायचे मजला कामा
पाय तरी हा कसा निघावा
रमणी इतुकी जर रामा

सार जराशी दूर खोडकर
बट ही रुळते गाली
घेऊन जाते चैन सारखी
खेळे चालीवरती चाली

ओठ टेकल्या कपास पाही
सुख ते दिव्य विचारून
कधी फळे हे भाग्य वाटते
मीच जातो न लाजून

उगा वाटते भय हे मजला
धारदार दृष्टीचे
सौंदर्यच तुज ठायी एकवट
स्मित गोड सृष्टीचे

कल्पनेतली जवळीक वाटे
घडून कधी का येईल
नयन हे मिटुनी घे ना थोडे
राजस जवळी येईल
तुझिया राजस जवळी येईल

दि. ०१/०२/२०२३
सकाळी १०.२३ वा.



४५

**सुखाच्या क्षणांना सहज तोलणे गे**

तुझ्या सोबतीने असे चालणे जे
सुखाच्या क्षणांना सहज तोलणे गे

तुझे हासणे ते निखळ हासणे जे
मनी चांदण्याच्या निशा पावणे गे
सुखाच्या क्षणांना सहज तोलणे गे

तुझे मान वेळावुनी लाजणे गे
फिरे मोरपीस सहजी मज वाटणे हे
सुखाच्या क्षणांना सहज तोलणे गे

तुझ्या संगतीने हे आयुष्य जाणे
जणू मोगरीच्या बनी गंध वाहणे गे
सुखाच्या क्षणांना सहज तोलणे गे

तुझे शब्द तो गोडवा अमृताचा
अशा माधुरीचा झरा झुळझुळणे गे
सुखाच्या क्षणांना सहज तोलणे गे

न संपो कधी आपुला सहवास येथे
जगण्याने देखील उगा रेंगाळणे हे
सुखाच्या क्षणांना सहज तोलणे गे

तुझ्या सोबतीने असे चालणे जे
सुखाच्या क्षणांना सहज तोलणे गे

दि. ०४/०२/२०२२
दुपारी ०२.०४ वा.



४६

## तिथे चंदनी भाव उरे

या प्रेमाला रेशीम बंधन
प्रेम सृष्टीचे सुंदर स्पंदन
धडकुन हृदयी जे जे राहते
त्या प्रेमाला जगती वंदन

देहावरती निव्वळ प्रेम न
प्रेम करावे अंतरावरी
क्षणा क्षणाला वाढत राहील
असे प्रेम हे येवो बहरी

सखोल ऐशा प्रेमासाठी
कोण ठरवुनी देईल एक दिन
एक दिवसाचा नसे सोहळा
हे तर वाढे पळपळ प्रतिदिन

स्पर्शामधुनी अनुरागाच्या
उमलुनी येतील मधुरा बागा
आळवीत जावे सूर लयीने
सुंदर प्रीतीच्या त्या रागा

प्रेमासाठी पाळून वचने
शब्दांचे नको फोल हे तोरण
प्रेम झळकते डोळ्यांमधुनी
आणि जन्म हा ठेवा तारण

व्यक्तिमधल्या व्यक्तीसाठी
आत भावना फुलून यावी
तिच्या सुखासाठी मग हृदयी
प्रीत कलिका खुलून यावी

देता यावे सारे सारे
अलगद माझे सर्व समर्पण
प्रेम आणखी काय असावे
कण कण आयुष्याचे अर्पण

समजून जावे तुलाही सारे
खेळ मनाचे नितळ खरे
देहापलीकडे प्रेमा नगरी
तिथे चंदनी भाव उरे

दि. १४/०२/२०२३
सकाळी ०६.१७ वा.



४७

**नुसत्या तुझ्या पाहण्याने**

नको नको ग अशा अदांनी
मजला घायाळू
हास्यामधले पुन्हा नको ग
धवल मोती ओघळू

आधीच सुंदर कर्णलोलकही
झुलुनी खिजवी मजला
तुझी खोडकर अल्लड दृष्टी
खोल रिझवी मजला

तो नाकावर जणू चांदवा
नथणीसम वाटे
अर्ध झाकला तू जो चेहरा
हातातून निसटे

त्यावर कळस हे केश मोकळे
वाऱ्यावर उडती
वळवून ठेविले तू उजवीकडे
परि जादुगरी घडती

पुरे एक छोटुशी बटही
रसिकास मारण्या
तूच करीशी जर घाव खोलवर
कोण येई तारण्या

इतकी सुंदर मोहक अस्त्रे
दिधली लावण्याने
प्रिये आहे मी जायबंदी ग
नुसत्या तुझ्या पाहण्याने

नको असे चालवू भराभर
तू मदनाचे बाण
जीव धडधडे काळीज उडते
माझी तुला ग आण

दि. १४/०२/२०२३
सायं. ०७.३५ वा.



४८

## तू जणु सुकुमार वेली

तू फुलांच्या गंधकोशी राहते ना
त्या कळ्यांच्या आडुनी हळु पाहते ना

गाल कुसुमी त्या दलांचे कोमलांगी
अंग अंग रेशमाचे तू शुभांगी

तू जणु सुकुमार वेली डोलणारी
तू सदा शब्देविणा मज बोलणारी

ते तुझे मधु हास्य आणि लाजणेही
ते तुझे अवखळ नि गोडवे वागणेही

पाहतो मी या फुलांतून तूच तू ना
राहतो मी स्वप्नी ज्या ती तूच तू ना

दि. २८/०२/२०२३
रात्री ११.३७ वा.



४९

**तुझ्या वाटेवर डोळे**

तुझ्या वाटेवर डोळे
वाट आसुसली आहे
तुझ्या पावलांची वाट
माझ्यासवे तीही पाहे

कधी येशील सख्या रे
आला पाऊस पहिला
गंध मातीत प्रीतीचा
बघ अजून राहिला

फुललेला मधुमास
मदनाचे दे इशारे
मला हुंगून जातात
तुझ्याकडे जाता वारे

दिशा गुंगून जातात
कुठे कुठे असशी तू
मला विचारा म्हणावं
कुठे कुठे नसशी तू

तुझ्या वाटेवर डोळे
सांज स्वप्नाली येते
प्रीत तुझ्या माझ्या मनी
सायलीची बाग होते

दि. ०९/१०/२०२३
रात्री ०८.१८ वा.



५०

## मधुमास फुले वनी

मधुमास मनामध्ये
मदनाचा गंधवारा
तुझ्या आठवांनी येतो
प्रिये तनूला शहारा

सुरभीत मोगरीच्या
माझी सकाळ नाहते
अबोलीची ही दुपार
मूक होऊन राहते

सांज जाईजुईतून
उमलून येत राही
डोळे तुझ्या वाटेकडे
नीज सुखस्वप्न पाही

रती कामदेव खेळे
खेळ वसंतात न्यारे
मनोरथ पुरवावे
तुझ्या समवेत सारे

ये ग ये ना तू कामिनी
माझ्या मनाची मोहिनी
ऋतू घेऊन ओंजळी
छेड तराणे रागिणी

तुजविण नाही काही
बाग ओसाड जीवनी
संगतीस असताना
मधुमास फुले वनी

दि. १७/०३/२०२३
सकाळी ०८.५४ वा.



## ५१
## असे मीलन देखणे

अलगद उघडल्या
दल कोवळ्या पाकळ्या
रंग उन्हाचे लेऊन
सोन सोनेरी साखळ्या

आत कुपी अत्तराची
दडविली खोल खोल
कण पराग होऊन
गंध वाऱ्याशी रे डोल

मधूप्राशनास आली
भृंग झुंबड राकट
मधुरव गुंजनात
सारा बहर झाकत

वनातली ही दिवाळी
रोज रोज तेजाळते
दिवे पेटून उठती
वनराई त्या माळते

धुंद रंग पसरती
अंग अंग मधुमय
हृदयात उमलते
प्रिया करे अनुनय

असे मीलन देखणे
रोज कृसुम सुमनी
सुकुमार नि नाजुक
माझी प्रियतम राणी

दि. १७/०३/२०२१
सकाळी ०९.२२ वा.




५२

**आल्हादाचा रंग गुलाबी**

मंद्र गुलाबी तंद्र तंद्री ही
सुंदर पाने बहराची
रंग रूप किती विलोभनीय हे
मेजवानी नित प्रहराची

अलगद चढतो रंग मनावर
दंग करून सोडतो क्षणी
क्षणात माझा असताना मी
प्रियेचा अवचित होतो झणी

जळात उतरून परी गुलाबी
क्षितिजावरती रेंगाळे
नभांगणातही रंग गुलाबी
मुशाफिरी करतो चाळे

लाडिक लाडिक गोड गोडवा
रंग गुलाबी गालावर
प्रिया लाजते होत गुलाबी
दैव गुलाबी भाळावर

आल्हादाचा रंग गुलाबी
श्याम निळाई विसरे हा
राधेसंगे होत गुलाबी
कुंजवनातून पसरे हा

दि. ०३/०४/२०२३
सकाळी ०७.५२ वा.



५३

**रसिक तो जो जपतो**
**सुरंगी क्षणाला**

सुरंगीचा गजरा तुला आठवावा
तारुण्य निधी कांचनी साठवावा

तुझे रम्य कुंतल असे रेशमाचे
ती वेणी सुबक पेड जणु काजळाचे

सांजेस मी रोज येता घराशी
सुरंगीच्या माळून देईन राशी

असा धुंद मादक मदहोश गंध
असा जुळवी राणी दृढ आपुले बंध

प्रिये मी अजूनही आणीन गजरा
तू लाज अजुनी तशी गोडवी जरा

अशी राहो घट्ट गजऱ्याशी वीण
घे ऐकुनी वाजते प्रीत बीन

रसिक तो जो जपतो सुरंगी क्षणाला
सुरंगीत जो मस्त करतो मनाला

दि. १०/०४/२०२३
सकाळी ०५.४३ वा.



५४

## तुला निरखून पाहू दे

ढगाआड लपलेल्या चांदव्याचा
मिश्किल रुबाब पहा तरी
गालावरची खळी त्याच्या
हसतेय गोड वरचे वरी

चांदण्याला आवरून
घडी करून ठेवलीय त्याने
रात्रीत ढगांच्या आवरणात
आडून आडून नुसते पाहणे

लपाछपीचा खेळ चाललाय
कधी दिसतोय कधी दडतोय
थंड शिरवाईत ढगांच्या कुशीत
मस्त मजेत उडतोय

तुझा खेळ होतोय खरा
जीव इथे प्रियवरांचा अधमरा
भावनांची भरती, भेटीची आस
तुझी साक्ष मनोमनी प्रीत दालनी खास

तुझ्या लपाछपीमुळे
जीव वरखाली होतो
तुझ्या गोडव्यामधे सखीच्या
मधुरतेचा भास होतो

थांब ना क्षणभर
तुला निरखून पाहू दे
सखी कधी येईल माहीत नाही
तुझ्यात मला हरखून जाऊ दे

दि. २८/०४/२०२३
सकाळी ०८.४७ वा.



५५

## तू हो म्हणता फुले मोगरी

काय तुझ्या ह्या अदा निराळ्या
निराळेच शर नजरेचे
भेदून जाती तनमन माझे
जन्म दास तव सदरेचे

तू सम्राज्ञी साम्राज्याची
सौंदर्यपुरी निनादली
खुल्या बटांच्या होत मशाली
सोळा शृंगारे सजली

चोळीवरती घुंगरांच्या ज्या
कला कुसरी तव रेखीयल्या
वर्दी देती येण्याची...
लावण्यशाही तव देखीयल्या

पैंजण रुणझुण करिती गुंजन
कंकणातले सुरेल रंजन
कृष्ण काजळी धार लोचनी
नजर न लागो म्हणोनि अंजन

ओठांवरती रंग गुलाबी
गालावरती चांद चांदणे
दो भुवयांच्या मध्ये चांदणी
जप मदमदने तुला सांगणे

स्वीकारून घे प्रीत मोहरी
तू हो म्हणता फुले मोगरी
कुठे कसा मी जाऊ सांग ना
जीव रंगला सुरंग अधरी

दि. २९/०४/२०२३
सकाळी ०८.५२ वा.




५६

**जगणे सुंदर तुजसवे वाटे**

सोनचाफ्याला माहीत आहे
तुझे नि माझे गूज
ऐकत असतो सदाच होऊन
साक्षी तो हितगुज

मी जे जे ही सांगत असतो
तुला मनीचे राणी
पाकळ्यातुनी मोहर बहरे
शृंगार सोनेरी आणि

गंध दरवळे मंद मीलनी
सुवर्णचंपक हसरा
उमलून येती कैक भावना
अंगावरती शहारा

त्या गंधावर तरंग उठती
माझ्या भावसुखाचे
तूही जवळी येऊन पाहशी
चंपा जीवनी साजे

जिथे कुठे पाहतो हा चाफा
तू मी आणिक परिमळ दाटे
सोबत आपुली सदा फुलावी
जगणे सुंदर तुजसवे वाटे

दि. ०१/०५/२०२३
सकाळी ०९.२२ वा.



५७

## ये ये राणी प्रीत दालनी

सोन झळाळी पानांमधली
इथे उतरली आहे
ही रानाची वाट सजूनी
सांज मंतरली आहे

बुंधे सोनेरी झाडे सोन्याची
सूर्य ओकतो सोने
क्षण दोघांचे अमूल्य सोने
मिळुनी लुटुन घेणे

तेज एक चमकते अंतरी
नयनांमधुनी तेज
तुझ्या आठवासवे उधळते
आसमंतीही तेज

कुणी न येथे प्रिये निवांत
असा लाभतो संग
या रानाच्या वाटेवरल्या
भुलीत होऊन दंग

चमक चांदणी केशर रंगी
कुणी उतरल्या पऱ्या
ना दिसती त्या झुलवून जाती
स्वप्न नाद झांजऱ्या

ये ये राणी प्रीत दालनी
पायघड्या हृदयाच्या
घे समजून अन् उमजून घे तू
रेशीमगाठी जन्माच्या

दि. ०१/०५/२०२३
सकाळी १०.५४ वा.



५८
**तुझ्या संगतीने**

तुझ्या चेहऱ्याला किती आठवावे
मनाला तुझ्यापाशी मी पाठवावे
ते गहिरे नि भेदक तुझे नेत्र राणी
मी सामावुनी जातो उरतो न आणि

भुवया कमानी खुणावून जाती
मधे लावलेली ती टिकली गुणाची
सरळ देखणी नासिका सुंदरी जी
नथनी विराजे पुन्हा त्यावरी ती

तुझ्या मल्मली ओष्ठ कलिका स्मराव्या
रातीही काळ्या तिळी बघ झुराव्या
शोभे हनु किती रेखीव सुंदर
गालही गुलाबी मन माझे कलंदर

निघालेली बट जी मला छेडताहे
प्रीतीत बघ आगळीक घडताहे
असे मी उरावे तुझ्या आठवातुन
असे मी झुरावे तुझ्या साठवातुन

तू काही न बोले तरी बोलकी तू
तू काही न सांगे तरी तरी सांगते तू
तुझ्या त्या सुरेल्या सुरातून गावे
तुझ्या संगतीने प्रिये मी जगावे

दि. ०९/०५/२०२३
सकाळी ०९.१४ वा.




५९

**मना सांग वेड्या तुला काय झाले**

धुके पांघरून रान वेडावलेले
हरवून वाटा गुडूप जाहलेले
कुणी पेरलेल्या सुखांच्या या राशी
मनाचा मनाशी कुणी मेळ घाले
मना सांग वेड्या तुला काय झाले

फुलांनी स्वतःला असे अंथरावे
कळ्या पाकळ्यांनी उगा थरथरावे
मला वाटते ओठ तव मंथरावे
शृंगार दव पानापानात ओले
मना सांग वेड्या तुला काय झाले

तरुंनी धुक्यातुन राहून स्तब्ध
फांदीवरी पल्लवांचेच शब्द
शीतल झुळूक ऐसी यावी हवीशी
हातात वाटे प्रारब्ध आले
मना सांग वेड्या तुला काय झाले

अशा जाणिवा त्रास देती मनाला
नको विरही वणवा जो जाळी तनाला
कणकण झुरावे तुझ्या भेटीसाठी
दिलासा मिठीत अन धुके खेळ चाले
मना सांग वेड्या तुला काय झाले

मला येऊ दे ना तुझ्या प्रीतकोशी
प्रिये का ग घेशी मोगऱ्याला उशाशी
सुगंधित वारे तुला स्पर्शिणारे
मी जातो पघळून मला काय झाले
मना सांग वेड्या तुला काय झाले

दि. ०९/०५/२०२३
सकाळी ०९.१३ वा.



६०

## रोज नव्याने नवी भासशी

नको अशी पाहूस सुंदरी
घालमेल मनी होते
क्षणात माझे हृदय प्रियतमे
होऊन तुझेच जाते

अतीव शोभते साडी मोहक
रंग गडद संगती
त्यावर शोभे मयूरपंखी
चोळी खडीची अंगती

पदर खोवला नीटनेटका
मोकळे त्यावर केस
टिकली भाळी कुंकूम रेखुन
कुंडले झुलविती हवेस

दंतकळ्या किती शुभ्र गोडव्या
मधुर हास्य मोहवी
नजर मधाची मधु मधाळी
प्रिये तू मज हवी हवी

रोज नव्याने नवी भासशी
रोज होतो घायाळ
साथ तुझी मज सदा लाभू दे
वसंत फुले मधुकाळ

दि. १४/०५/२०२३
सकाळी १०.४१ वा.



६१

**प्राजक्ता तू आणि ती**

पारिजातकाच्या फुला
कसे सांगू भाव तुला
जितके नाजूक असशी
प्रिया माझी तशी कोमला

तुज आणिले जगजेठीने
धरातलावरी
तिला मजसाठीच निर्मिले
धात्याने खरोखरी

रुक्मिणीच्या प्रीतीचा तू
साक्ष असशी ना
आजही त्या रती हृदयी
अलगद वसशी ना

तिच्या मना सुकुमारा
जपून सांभाळीन
तुलाही मी अंगणी मज
नित्य प्रतिपाळीन

कोमलांगी प्रियतमा ही
लाजते अशी
प्राजक्ता तू आणि ती
जवळची सखी

ती न भेटे किती वाट
पाहतो तिची
तुला पाहूनिया जागे
स्मृती सखीची

दि. २२/०५/२०२३
सकाळी ०८.४९ वा.



६२

**नव तरुणी प्रियसखी**

कुरळ्या तुझ्या केसांच्या आडून
डोकवी मुख चंद्रमा
जसे वाटते मम स्वप्नांची
आशा छेदिते तमा

नव तरुणी प्रियसखी तू माझी
दिसशी इतुकी गोड
कंठी नाजूक मंगळसूत्र नि
ओठी रागही अजोड

नव्या दमाचा नव्या रीतीचा
पोशाखाचा थाट
नवीच घेशी रोज प्रियतमे
जणू चालण्या वाट

विशाल भाळी भाग्य रेखिले
ज्यावर माझा संग
बुडून जातो केश कलापी
होऊनिया मी दंग

गहन मोजके तुझे हासणे
काहीतरी सांगते
तुज सूर्याची किरणे बिलगून
तम राणी पांगते

पाहत राहतो निरखत बसतो
विधात्याची कृती छान
दे मज हाती तुझ्या प्रीतीचे
भरभरून गे दान

दि. १६/०५/२०२३
सकाळी ०६.५८ वा.



६३

## सुकुमार सुमन वेड्या

कुठल्या फुलास माहीत
परिमळणे कोणासाठी
दरवळ सहर्ष नेतो
वारा दहा दिशाही

आतून सुमन सुंदर
मम भाव परागांचे
करतील पुष्प सोपे
प्रकटन अनुरागांचे

झणी भावना फुलातुन
त्या काळजात जातील
सखीचा निरोप माझ्या
हासून ते पहातील

ते कापरे अधर अन्
थरथरती तनु कोमल
तन्वी भुलून जाईल
पाहून पुष्प सेजल

आता न कळते कोण
होते क्षणी सलज्ज
ते कुसुम प्रियांगी का
प्रियाराधक मी सज्ज

कैसे मी फेडू ऋण हे
सुकुमार सुमन वेड्या
रती कोरते मनात
मदनाच्या पडती बेड्या

दि. २७/०५/२०२३
सायं. ०६.११ वा.



६४

## आयुष्याची होऊन बकुळी

ओंजळीतल्या बकुळफुलांनो
मन माझे जाणता
गंध खोलवर दरवळतो अन्
स्मृती सहजी आणता
प्रियाच्या, स्मृती सहजी आणता

कवळ्या कवळ्या तुझ्या पाकळ्या
जणू सांगती कथा आगळ्या
रसिक तुझे ते असतील अगणिक
कुणी आहे का हृदय मानता
प्रियाच्या, स्मृती सहजी आणता

उंच तरूवर उमलून फुलणे
स्वतः स्वतःशीचे जे खुलणे
अलगद एका हळव्या क्षणी त्या
झोकून पदतळी ओघळू पहाता
प्रियाच्या, स्मृती सहजी आणता

मीही देते सुगंध प्रीती
प्रियवर मीलनी अनोखी रीती
अशीच देते परिमळ सखया
मिठीत त्याच्या मिटून जाता
प्रियाच्या, स्मृती सहजी आणता

सुरभी व्हावी जगण्याची या
आयुष्याची होऊन बकुळी
रोज नव्याने होऊनी कलिका
फूल उमलुनी बकुळी होता
प्रियाच्या, स्मृती सहजी आणता

दि. २८/०५/२०२३
रात्री ०८.३१ वा.



६५

## मन जडले प्रिये हे तुजवर

चल रंगवू या, आशा मनीच्या
स्वप्नांच्या पटलावर
प्रीत कुंचला हाती माझ्या
उडतील फुले नभावर

गंध पसरतील वनावनातून
वारे हळवे होतील
कोसळणारे प्रपात सारे
अलगद झोकून देतील

पराग आपसुक उडउडुनी ते
मधुकर हस्ते जातील
कळ्या कळ्या न राहतील पटकन
फुले होऊनी पाहतील

ढगाढगांच्या नक्षी साऱ्या
तरंगताना पहावे
दिवा मनातील उजळून जाईल
संगे तू ग रहावे

आता दिसशील परी गोजिरी
तू मी तुझा ग प्रियवर
येईन दुरून जगणे भरून
मन जडले प्रिये हे तुजवर

दि. २२/०६/२०२३
रात्री ११.४१ वा.



६६

## चिंब माझे हृदय ओले

नको झटकूस केसांना
जळाचे मोती गळतात
वेचूनी घ्यावे म्हणताना
दवाचे रूप धरतात

तुझ्या त्या मोकळ्या केशी
कुठूनसे गंध भरतात
श्वास माझे प्रिये राणी
तुझ्यापाशीच उरतात

तू ओलेती चिंब झाली
चिंब माझे हृदय ओले
ऋतू पाऊस ल्येतो अन्
नाद जलधारेतुन बोले

तू असे नयन मिटून घेशी
मला सुख स्वप्नं दाखवता
ओढ ही असली कसली ग
कधीही मने न भेटवता

आज मी देतो कबुली एक
तूच तू क्षणी जीवनी या
कधीही नव्हते कोणीही
नसेलही राणी मनी ग या

दि. २७/०६/२०२३
रात्री ०७.५१ वा.



६७

## सखे हृदय प्रीतविभोर

भिजलं सारं शहर तरी
तुझी माझी भिज निराळी
प्रीतीच्या वर्षावाने
तनामनास धुंदी आली

एक पाऊस आभाळातला
बरस बरस बरसून जातो
एक चातक डोळ्यामधला
भिजूनही तरसून जातो

नजर आसुसलेली जेव्हा
आल्हादाने चिंब होते
मधुर हास्यामधला स्वीकार
मनाचे या बिंब होते

वाफाळलेला चहा मग
घोट घोट अमृत भासे
कुठून आली गोडी म्हणता
जवळीकता देत दिलासे

तुझी माझी भेट अशी
थुई थुई मनातला मोर
गडदशा मेघासंगे
सखे हृदय प्रीतविभोर
सखे हृदय प्रीतविभोर...

दि. २८/०६/२०२३
सकाळी ०८.०८ वा.



६८

## प्रिये तू सांग पटलं का

तुला असं पाहतंच रहावं
स्वतःला विसरूनी जावं
नकळता मी मला काही
तुझा आपसूक ग व्हावं

तुझ्या वेणीत माळावे
क्षणांना मी फुले होऊन
तुझ्या नजरेत रेखावे
मी रेखाचित्र रेखाटून

तुझ्या हास्यातले मोती
मी होऊन ओघळत यावे
तुझ्या अधरांवरी थांबून
मीही पाघळत जावे

हवेच्या झोक्याने उडतील
जरा नखरेल बट राण्या
मी झुलवून द्यावे त्यांना नि
झुकावे थोडे तुज पाहण्या

तुझ्या श्वासातल्या गंधात
मी गंधाळुनी जावे
स्वतःला चंदनापरी ते
उगाळुनी तुज मुखी रहावे

प्रिये तू सांग पटलं का
तुला हे जे मी म्हटलेलं
तुझ्या मनी दे जरा जागा
कोडं हे गोड सुटलेलं

दि. ०७/०७/२०२३
सायं. ०७.१६ वा.



६९

## ऐक ग प्रिये गाज ती

चिंब ओली ओलेती तू
थेंब ओघळून आले
मोती शोभून सुंदर
तुझी आभूषणं झाले

साडी लिपटून गेली
अंग अंगाशी भिडली
चोळी धुंद धुंदीतून
तुझ्या तनुशी अडली

केस भिज भिजलेले
तारा सुरांच्या छेडती
झटकता लाडे थोडे
दव फुले ग पडती

तुझी बेभान ती धुंदी
मस्ती मस्तवाल आहे
रती मदनाची जणू
रूप दर्पणात पाहे

छुमछुम पैंजणात
थेंब दवाचे वाजती
प्रीतसागर उसळे
ऐक ग प्रिये गाज ती
ऐक ग प्रिये गाज ती

दि. ११/०७/२०२३
सकाळी ०७.२१ वा.



७०

## बकुळ नसतो कधी फितुर

ओंजळीतल्या बकुळफुलांनो
सांगा कसे मी रहावे
प्रियाविना नुसतेच सुगंधी
कोश मी कैसे वहावे

एक एक क्षण होता तुम्ही
सोबत दोघामध्ये
तुम्हीच केली दूतगिरी की
लाडिक वादामध्ये

सांज सकाळी वाट पाहता
तुम्हीच साथी होता
मीलन राती घट्ट मिटूनी
नयन झाकले रहाता

तुमच्या गंधामध्ये मिसळुनी
सुरभित श्वासा केले
कळ्या कोवळ्या फुलेही नाजूक
परिमळ दाटून आले

किती आठवणी माझ्या तुमच्या
सोबतीने घडलेल्या
गेला रसिकही तुम्हा सोडुनी
वाटा ओस पडलेल्या

दुःख विरही ते तुम्हीही विरही
मी विरहातील आतुर
नका सोडू ना साथ तुम्ही तरी
बकुळ नसतो कधी फितुर

दि. १४/०७/२०२३
सकाळी ०९.३२ वा.



७१

## तुजला तो काय भिजवील

बघताक्षणी तुला ग
ओथंबला हा पाऊस
मिळते कुठे तयाला
विश्रांती इतकी घाऊक

आलीस तू तिथूनी
का सांग ग निघूनी
स्वर्गीय रूप सुंदर
भुलतो तुला बघूनी

हैराण झाला वारा
श्यामल निळे हे नभही
बघण्या तुला तरसती
बरसून जातो मेघही

तू माळले विजेला
केसात चमचमावी
तू माळ तारकांची
घालून गळा पहावी

तुजला तो काय भिजवील
पाऊस स्वतःच ओला
लावण्य पाहता तव
बेहोशी चिंब झाला

दि. १९/०७/२०२३
रात्री ०९.४१ वा.



७२

## सौंदर्याची तू अभिभूल

कोड्यात कोडं फुलात फूल
मनास पडते कसली भूल
वयास विसरून जातो मी
मदनबाधेची तू चाहूल

कशास देते वाऱ्या हूल
तुझीच लागे ऋतू चाहूल
नजर न हटते तुझ्यावरून
मदमस्तीचा वाजे बिगुल

दिलास वेड्या अजबच खूळ
उघडे लोचन स्वप्नं बकुळ
आस तुझी भास तुझा
तुला दास गे मी अनुकूल

सौंदर्याची तू अभिभूल
हृदयी कामना तुझीच झूल
अशा अदा मोह सदा
नजर बाण उठवी मज शूल

ऐक प्रिये लावण्य विपुल
तू  निर्मिती अनमोल बहुल
जो जो पाहील बेहोशीने
कोण सांग ना हो मशगूल

दि. २०/०७/२०२३
रात्री ०९.२६ वा.



## ७३
## **कुंडल घुंगरू झाले अनावरू**

तुझ्या कर्णकुंडलात झरतो
मज प्रीतीचा धबधबा
बहरून आली सृष्टी सारी
लावण्याचा दबदबा
तुज लावण्याचा दबदबा

मानेवरती भिजूनी रुळल्या
किती गोडुल्या बटा
दंगून जाती झाडेवेली
तुझ्या अनोख्या छटा

काय निरखुनी पाहशी पाण्या
भुलूनी घळतो प्रवाह
झरा केवढा उत्सुक राणी
नदीभेटीस अगाध

तुझ्या रोमरोमी सामावून
तुज संगती हसावे
वर्षावातील कथा आपुल्या
गाव नव्याने वसावे

स्पर्श तुझा ज्या ज्याला होईल
रंग खुलूनी ते येतील
कुंडल घुंगरू झाले अनावरू
मीलनी मिटून जातील

दि. ०१/०८/२०२३
सकाळी ०८.४७ वा.



७४

**मदनदाह लेखणी**

अहा देखणा तुझा चेहरा
चंद्रकोर भाळी
गुलाबपुष्पे कोळून आली
अधरांवर लाली

कंठी शोभे गळा मयूरी
माळ कशी रुळते
नथ मोत्यांची नासिकेतली
प्रीत मुखी खुलते

हिरवा हिरवा चुडा जो बरवा
शृंगाराची खूण
तुला पाहता मनमोराचा
भाव उमले आतून

लुगडे नेटके मराठमोळे
पैंजण चरणाशी
चोळीवरली नक्षी बोलते
गूज जे कानाशी

तुला पाहुनी क्षणी भाळणे
मदनबाण चालणे
जणू तुला ना काहीच कळले
असे तुझे वागणे

नको अशी वागूस सुंदरी
नजर एकदा वळव
काहीतरी तू करून मोहिनी
मदनलेख मज कळव

आत चालली जी प्राणांची
धडपड कधी तुज कळे
काळजातली घालमेल ही
तुझ्या लाभासव फळे

नको एवढी मादक पाहू
छबी मधुर देखणी
कसे सावरू मनास माझ्या
मदनदाह लेखणी
तू ... मदनदाह लेखणी

दि. १३/०८/२०२३
सकाळी ०६.५७ वा.



७५

**तुझाच राहीन होऊन**

तुझ्या लाजेच्या प्राजक्ताचा
बहर भरातच राहो
प्रीत भावना नाजुक सजणी
वर्षावी मी नाहो

झुळूक हवेची जराजरासी
तुला स्पर्शूनी जाते
दूर दूर वाहत जाताना
स्वतःच हर्षुनी जाते

नजर तुझी जी वळते खाली
शहारून मी जातो
अजून तुझ्यावर वरचेवर मी
फिदा होऊनी जातो

नुसत्या शब्द फुलांनी कोठून
लाजाळू तू होते
स्पर्शामधले ते हळवेपण
स्मरणामध्ये रहाते

अशी तुझी लाजरी छबी ग
हृदयकोंदणी ठेवून
कुठेही जरी असलो मी तर
तुझाच राहीन होऊन
प्रियतमे, तुझाच राहीन होऊन

दि. २६/०८/२०२३
रात्री ११.१९ वा.



७६

## हास्य तुझे लाघवी

तुझे स्मित ते गोजिरवाणे
खळी खुलवुनी जाते
ओठांमधले दबके हासू
कळी फुलवुनी जाते

अर्धे मुर्धे खुलता हास्य ते
आशा पल्लवती ना
तुझ्या होकारासाठी राणी
जीव टांगणीला ना

अजून थोडे खुलुनी हसता
मोती घरंगळतात
धरून चेहरा हाती माझ्या
पाहण्या कर वळतात

खळखळून तू हसशी जेव्हा
मीच सुखावून जातो
तुझ्या खुशीच्या क्षणाक्षणाला
साक्षी होत मी राहतो

पण सांगू का कशीही हास तू
हास्य तुझे लाघवी
तुला सदाची ठेवीन खुश मी
स्वप्नं हृदय दाखवी

दि. ०४/०९/२०२३
सकाळी ०९.१३ वा.



७७

## गुलाबपुष्पापरी वहावे

फुलले फुलले गुलाब दोन
मनी उमलले सांग ग कोण
नेम कोणते कुणी मारे
मदनबाण की भाले कोन

कळी कळी खुलवुनी गेली
स्पर्श मुलायम मल्मली
रंग ठसवुनी जातो हा
गुलाब गुल की दंग गुलाली

कुणी अधरांवर पिळले फूल
तव गालांवर टाकीत भूल
वरच्या गंधित दवबिंदूंच्या
खळ्या पाडिल्या गहन विपूल

कधी वाटते तेजाली तू
कधी मधाळी मधुली तू
कधी गोडसर गोड गुलाबी
मधुराणी मनमानी तू

पुन्हा पुन्हा पाहुनी पहावे
पुन्हा पुन्हा राहुनी रहावे
तुझ्याच ह्रदयी मनास माझ्या
गुलाबपुष्पापरी वहावे

दि. १२/०९/२०२३
रात्री ०९.४९ वा.



७८

## असाच राहीन नजरेतून तव

तुझी नेत्र पल्लवी चालते
गर्दीतून मजसी
कसे सांगू मी क्षणात घायाळ
मनातून तुजसी

खोल गहनशा नयनसागरी
रोज बुडावे वाटे
तुझ्यासवे प्रियसखी संगिनी
स्वप्नांबरी उडावे वाटे

तुझ्या पापण्या दाट काळसर
मजसी खुणावणाऱ्या
जणू नदीच्या काठावरती
विरहिणी कुणी झुरणाऱ्या

चंचल पक्षिणी दो बुबुळांच्या
भिरभिर मज शोधती
कधी मिटून तू घेत लोचने
किती बोल बोलसी

असाच राहीन नजरेतून तव
सदा तुझा होऊनी
मला प्रिये घे दो डोळ्यांच्या
स्वप्नी सामावुनी

दि. १६/०९/२०२३
सायं. ०६.३० वा.



७९

## प्रिये शरद पौर्णिमा

पिठुर पिठुर चांदणं
चांदण्यात गुंगणं
गुंगण्यात रंगणं
रात कोजागिरी

तुझ्यासवे चालणं
चालताना बोलणं
वचन गोड पाळणं
सखे साजणी

कोणता बघू प्रिये
चंद्रमा तुझ्यासवे
मुखचंद्र मधुर गोड की
गोड नभी चांदणी

भाग्य मजसी वाटते
तू जी मजला भेटते
मन अधीरता गाठते
कसे सावरू

प्रिये शरद पौर्णिमा
तुज मुखी जी लालिमा
रूपसी मनोरमा
तू  मोहिनी

दि. २८/१०/२०२३
रात्री १०.३१ वा.
कोजागिरी पौर्णिमेच्या शुभेच्छा



८०

## स्वीकार भावनांचा

तुझ्या माझ्या प्रीतीला गे वय का आडवे
फुलाफुलातून गुंजे भ्रमर गोडवे

जगाला दिसते वय सुरकुतलेले
मला ते हळवे मन मऊसुतलेले

कळेल का कुणा तुझ्या हसण्याची गोडी
लपून छपून वाट पाहण्याची खोडी

तेंव्हा वाट चुकलो ते वय चुकलेले
चल जगू क्षण छान होते मुकलेले

तुझ्या डोळ्यातली दिसे मजला चमक
अंगी बळ येते तुझ्या पावली दमक

उघडून खिडकीला गुच्छ घे फुलांचा
तूही एक फूल राणी स्वीकार भावनांचा
कर माझ्या भावनांचा...

दि. १६/११/२०२३
रात्री ११.५८ वा.



८१

## खुणवत राही वाट सोनेरी

पीतफुलांच्या सड्यात होती
सोनसोनळी तुझी आठवण
गाव नदीच्या काठावरती
ओंजळीत स्मृती शिंपल साठवण

त्या प्रासादी एक कांचनी
तरू तरुण जो पहारा देई
त्या कुसुमांच्या मखमालीशा
पायघड्यांची सय मज येई

मऊ मऊशा स्पर्शामधले
ते भूतकालीन रंग देखणे
ते हलकेसे फुलाफुलांच्या
स्वप्नांना तू मी नित रेखणे

अंगावरती पडतानाही
किती कोवळ्या झरती भावना
एक अनामिक ओढ ती तिथली
ओढत नेते आजही मना

खुणवत राही वाट सोनेरी
सांजेची ती पिवळी पश्चिम
उगवत होती सोनसकाळही
सोनपिवळीशी सकळसुलश्चिम

दि. १७/११/२०२३
रात्री १०.५८ वा.

# लेखिकेचा परिचय


- **डॉ. मंजूषा पंढरीनाथ कुलकर्णी,**

  पीएच. डी. (संस्कृत), नेट (संस्कृत), सेट (शिक्षणशास्त्र), एम.ए. (संस्कृत), एम.एड., राजपत्रित अधिकारी वर्ग १ (महाराष्ट्र शासन, भारत) (सहाय्यक प्राध्यापक - संस्कृत)

  २३१ समर्थ अलंकार, सदनिका क्र. २, कवितांच्या बागेसमोर, विठ्ठल रुक्मिणी मंदिराजवळ, ज्योतीनगर, छ. संभाजीनगर - ४०० ००५

  ई-मेल : dr.manjushak@gmail.com

  मोबाइल : + ९१ ९८२२८ ३९४९१ । व्हाट्सएप; +९१ ९०८२१ ६१५२४


**सध्या :**

- **प्रशासकीय अधिकारी, मुख्यमंत्री कार्यालय, मंत्रालय, मुंबई (महाराष्ट्र)** येथे राजपत्रित अधिकारी वर्ग १ म्हणून कार्यरत.
- महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये राज्यात सर्वप्रथम स्थान अधिगत आणि राजपत्रित अधिकारी वर्ग १ शासनसेवेमध्ये २२ वर्षांपासून कार्यरत.
- **संस्कृत सल्लागार मंडळाची सदस्य, साहित्य अकादमी, नवी दिल्ली. (https://sahitya-akademi.gov.in)**
- व्यापकदृष्ट्या मान्यताप्राप्त संस्कृत भाषातज्ज्ञ, **साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२० प्राप्त,** उच्च शिक्षणातील शैक्षणिक विचारवंत, उच्च प्रशंसित कवयित्री, लेखिका, संशोधक आणि वक्ता.
- तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लिखित ''वैदिक साहित्याचा इतिहास'' (२६० पृष्ठे) या **मराठी पुस्तकाचा (साहित्य अकादमी पुरस्कृत) संस्कृतमध्ये अनुवाद करण्याचा विशेष प्रतिष्ठेचा प्रकल्प** साहित्य अकादमीने प्रदान केला होता, जो पूर्णत्वाला जाऊन साहित्य अकादमीद्वारे अनुवाद प्रकाशित.
- आचार्य बाळाराव **सावरकर लिखित स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या चरित्राच्या (अंदाजे २००० पृष्ठांच्या) ४ खंडांचा अत्यंत सन्मानाचा संस्कृत अनुवाद प्रकल्प** स्वातंत्र्यवीर सावरकर राष्ट्रीय स्मारक, मुंबई यांनी स्वाधीन केला आहे. त्यापैकी प्रथम खंडाचा अनुवाद पूर्ण झालेला असून प्रकाशनाच्या मार्गावर.

- गेल्या २५ वर्षांपासून, भाषा, साहित्य, संस्कृती, कला, नाटक, शिक्षण आणि भाषेशी संबंधित विधायक कार्याचा प्रसार करण्याच्या ध्येयाने प्रेरित अन् कार्यरत आहे.
- संस्कृतच्या प्राध्यापिका, वसंतराव नाईक शासकीय कला आणि सामाजिक शिक्षण संस्था, नागपूर.
- **महाराष्ट्र शासनाच्या पहिल्या पूर्णवेळ महिला भाषा संचालक आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र शासनमध्ये प्रशासकीय अधिकारी** ह्या पदांवर कार्यभार सांभाळला.
- पुणे विद्यापीठातून पदवी आणि पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले
- तसेच पुण्यातील एसएनडीटी विद्यापीठामधून देखील बी.एड. आणि एम.एड. पूर्ण केले.
- एकाच वेळी पुणे विद्यापीठ आणि टिळक महाराष्ट्र विद्यापीठात अव्वल येण्याचा बहुमान मिळवला.
- MPSC वर्ग-एक परीक्षेमध्ये संस्कृत या विषयामध्ये सर्वप्रथम येण्याचा बहुमान
- विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदा, चर्चासत्रे आणि परिसंवादांमध्ये अनेक शैक्षणिक शोधनिबंध सादर केले आणि अनेक प्रतिष्ठित पुरस्कार जिंकले.

**लक्षणीय योगदान :**

डॉ. मंजूषा या भाषा, कला, नाटक, संस्कृती, प्रशासन, साहित्य आणि शिक्षण या क्षेत्रांमध्ये अनेक बहुमुखी भूमिकांमध्ये योगदान देत आहेत. त्या संस्कृतमधील एक प्रसिद्ध प्राध्यापिका, एक प्रसिद्ध वक्ता, एक विचारशील प्रवचनकार, एक वाचक, एक उद्घोषक, एकल-कलाकार-नाट्यकलावंत/सादरकर्त्या, एक कवयित्री, एक संशोधक, एक लेखिका आणि अशा अनेक क्षेत्रांमध्ये नैपुण्य असलेल्या विदुषी आहेत.

गेल्या काही वर्षांमध्ये डॉ. मंजूषा यांनी भाषिक संशोधन, अनुवाद, भाषा आणि कोशविकास आणि भाषा धोरणाची निर्मिती अशा अनेक महत्त्वपूर्ण क्रियाकार्यांचे नेतृत्व केले आहे. शिक्षण, साहित्य, प्रशासन आणि संस्कृती या

क्षेत्रातील त्यांच्या अद्‌भुत योगदानाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार आणि सन्मानचिन्हांनी सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. मंजूषा यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात जागतिक स्तरावर विश्वविक्रमधारक अशी एक अनोखी ओळख निर्माण केली आहे आणि चरित्र, कविता, ललित आणि तात्त्विक तसेच वैचारिक लेखन अशा सर्व संबंधित शैलींमध्ये त्या एक उत्कृष्ट आणि प्रथितयश लेखिका म्हणून चमकत आहेत.

**प्रकाशमार्गा :** हे पुस्तक डॉ. प्रकाश बाबा आमटे यांच्या चरित्राचा (मराठी भाषेतील) डॉ. मंजूषा यांनी केलेला संस्कृत अनुवाद आहे ज्याला २०२० वर्षातील साहित्य अकादमीच्या अनुवाद पुरस्काराने गौरविले गेले. डॉ. आमटे यांच्या या अद्‌भुत जीवनप्रवासाचा संस्कृतमध्ये अनुवाद करण्यात डॉ. मंजूषा यशस्वी ठरल्या आहेत.

**''साहित्यिक व्रत''** म्हणून गेल्या ६ वर्षांपासून, डॉ. मंजूषा रोज काव्यरचना रचत आहेत आणि प्रसारित करत आहेत. त्यानिमित्ताने मराठी कवितेतील 'हाय रेंज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये जागतिक विक्रम केल्याबद्दल महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री. भगतसिंग कोश्यारी जी यांच्या हस्ते डॉ. मंजूषा यांचा सत्कार झाला आहे.

**प्रकाशित पुस्तके –**

- डॉ. मंजूषा यांनी मराठी, संस्कृत आणि इतर भाषांमध्ये अनेक उत्तम पुस्तके लिहिली आहेत आणि त्यांचे पहिले पुस्तक 'विवाह संस्कार' २०१० या वर्षी प्रकाशित झाले. त्यानंतर डॉ. मंजूषा यांनी संस्कृतमधील इतर अनेक पुस्तके प्रकाशित केली आहेत ज्यामध्ये श्यामस्य माता, विवेकानंदस्य विचारसौंदर्यम्, वेदकालीन स्त्रीरत्नानि, स्मृतिवचनानि, स्मृतिप्रतिपादित न्यायः, विवेकरत्नानि, प्रकाशमार्गा : अशी अनेक पुस्तके संस्कृतमध्ये रचली व अनुवादित केलेली आहेत. तर 'प्राचीन भारतीय समाज', 'सूर्य शक्ती और मानव', 'कौटिलीय अर्थशास्त्र', 'स्मृतीग्रंथ – भाग १ और २' ही त्यांची हिंदी भाषेतील पाच पुस्तके प्रकाशित झाली आहेत.

  त्यांच्या मराठीतील पुस्तकांमध्ये अनमोल विचार ठेवा – नचिकेता (लेखांचा संग्रह), लावण्यखणी (मराठी लावणी गाण्यांचा संग्रह), कणखरबाणा राणी

अहिल्या (अहिल्याबाई होळकर यांचे चरित्र), बकुळफुले (फुलांवरील कविता), मृद्‌गंध (ग्रामीण मराठी भाषेतील कवितांचा संग्रह), एक पाती गवताची (ललित लेखसंग्रह), प्रीतसुधा, आरसपाणी-जीवनगाणी (मानवी जीवनावरील कवितांचा संग्रह), गोड-गोड पापा (बालकवितांचा संग्रह), सर्ग-निसर्ग, संतोष, उत्कर्ष, पूर्वा (निसर्गावरील कविता), नाथा पंढरीनाथा, ईश भाग्येश (देवभक्तीपर), मंगेश, आंदण (प्रासंगिक), रूप-स्वरूप (राधाकृष्ण), अलवार, मधुश्री (ऋतू), सुधांशु (चंद्र), दिव्यांतरी (सूर्य), अळुमाळु (फुले), सुरभी (फुले), खाणाखुणा (पशु), वैष्णवी (पक्षी), नादश्रुती, श्वेता (तिच्यावरील प्रीत कविता), स्वामिनी (स्त्रीजीवन - भाग १), मृणालिनी (स्त्रीजीवन - भाग २), प्रमिला (धरती-आकाश), लाघव वेळा (सकाळ-संध्याकाळ), मनमंदिरा, तेजशलाका, उदय, मंजुभारती (जीवनपर कविता), प्रियतमा शुभांगी, नेहा, सुधीर (त्याच्यावरील प्रीत कविता) यांचा समावेश आहे.

याशिवाय विज्ञानातील संस्कृत, स्मृती धारा भाग-१ आणि भाग २, चतुरंग, शोधामृत, संस्कृत मराठी उखाणे, गौरवगाथा सूर्याची, जीवनचिंतन, भावमंजूषा, विचारकणिका, वेदकालीन स्त्रीरत्ने आणि अणुविज्ञानातील झंझावात - डॉ. अनिल काकोडकर, प्राचीन भारतीय समाज. ही पुस्तके देखील प्रकाशित आहेत. त्यांचे मराठीमध्ये ‘मंजु मंजिरी’ आणि ‘सर्ग निसर्ग’ नावाने ऑडिओ कवितासंग्रहही प्रकाशित झालेले आहेत.

**प्रकाशनाच्या वाटेवरील पुस्तके –**

(राधाकृष्ण) - श्रीरंग, कृष्णकांत, (निसर्गपर) - सृष्टीगंध, (वेळा) - तेव्हा, (मिश्र कविता) - गंधराणी, हृदयस्पर्शी, कवडसा, मृण्मयी, अबोली, (ऋतू) - सहा सोहळे, नभ मोजताना, (पाऊस कविता) - श्रावणी, (गझल) - उल्का, (रसिकप्रतिक्रिया - कवीश्वर) - बोल बरवे, (अन्य रसिक प्रतिक्रिया) -प्रतिसाद, रसिकवरा, हृदयतरंग, अनुबंध (वाट) - जरा रेंगाळले, (Audio - Book) - युगंधरा, कामिनी, (रंग) - रंगतनु, (गझल) - मनस्विनी, (सर्वोत्कृष्ट कविता) - माझी कविता, (ललितलेख) - मन्मनी, इंदुमती, मंजुश्री, मानसी.

**मिळालेले पुरस्कार :**

**पुरस्काराचे नाव आणि वर्ष –**

- कोकण मराठी साहित्य परिषदेचा अत्यंत मानाचा २०२२–२३ चा ललित गद्य विभागातील द्वितीय क्रमांकाचा सौ. लक्ष्मीबाई व राजाभाऊ गवांदे पुरस्कार 'एक पाती गवताची' या ललितलेखसंग्रहास प्राप्त झाला आहे.
- शिक्षाश्री सन्मान – २०२४
- स्व. वा.ना. उत्पात स्मृती पुरस्कार – २०२३
- परळी भूषण पुरस्कार २०२३
- मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय २०२३ पुरस्कार (गौरव गाथा सूर्याची साठी)
- संस्कृत भाषा सभा नाशिक, महाराष्ट्र तर्फे डॉ. व्ही. एम. गोगटे स्मृती पुरस्कार २०२३
- अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक २०२२ तर्फे सन्मान आणि सत्कार
- अखिल देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण मध्यवर्ती मंडळ, वडोदरा तर्फे ''साहित्य रत्न'' पुरस्कार २०२२
- सरस्वतीदेवी विद्या विकास ट्रस्ट पुरस्कार २०२२
- प्रेमचंद सन्मान २०२२
- अणुविज्ञानातील झंझावात : डॉ. अनिल काकोडकर – ३ राज्यस्तरीय पुरस्कार प्राप्त
- महात्मा फुले राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार (महाराष्ट्र साहित्य प्रतिष्ठान) २०२१
- राज्यस्तरीय संत नामदेव चरित्र साहित्य पुरस्कार २०२०
- लेखक सुनील रंगराव देसाई राज्यस्तरीय बाल–साहित्य पुरस्कार २०२९
- संस्कृतसाठी साहित्य अकादमी अनुवाद पुरस्कार २०२०
- राष्ट्रपती पुरस्कार विजेते दिवंगत व्ही.डी. सर्जे गुरुजी प्रतिष्ठानचा जीवन गौरव पुरस्कार २०१८

- पत्रकार उत्कर्ष समिती (मुंबई)चा राज्यस्तरिय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२७
- शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ आष्टी जि. बीड (महाराष्ट्र) चा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार
- द्वारका प्रतिष्ठानचा राज्यस्तरीय सर्वोत्कृष्ट प्रशासक पुरस्कार
- गोस्वामी संत तुलसीदासकृत रामचरित मानस पुरस्कार २०२६
- राज्यस्तरीय दैनिक भास्कर महिला पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय लोकमत सखी सम्राज्ञी पुरस्कार २०१२
- दिल्ली संस्कृत अकादमी, अखिल भारतीय-नवोदित - संस्कृत कवि प्रतियोगिता पुरस्कार २०१२
- लोकमत माझी आई पुरस्कार २०१२
- राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - संहितालेखन प्रथम पारितोषिक २०११
- संस्कृत नाट्य महोत्सव - नाट्य द्वितीय पारितोषिक २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०११
- राज्यस्तरीय विद्यारत्न पुरस्कार २०१०
- S.N.D.T. महिला विद्यापीठ, सर्वतृतीया २००१
- मध्यप्रदेश संस्कृत अकादमी राष्ट्रीय निबंध रचना पुरस्कार १९९८
- महाराष्ट्र राज्यशासन संस्कृत प्राविण्य पुरस्कार १९९८

- **Digital Content :**

| अ.क्र. | तपशील | लिंक |
|---|---|---|
| १ | सखी सह्याद्री<br>मुलाखत,<br>दि. १०-१०-२०२४ | https://www.facebook.com/share/v/FmEuAjAVeKGrunYB/?mibextid=WC7FNe |
| २ | सोनाली नवांगुळ, डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमीचा अनुवादासाठी पुरस्कार | https://www.loksatta.com/pune-news/sonali-nawangul-dr-manjusha-ku-lakarni-sahitya-akademi-award-for-translation-akp-94- 2600116 ?utm_source=whatsapp_web & utm_medium =social& utm_campaign=socialsharebuttons |
| ३ | "आपल्यालाच आपला प्रकाश होता आलं पाहिजे." साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्या नंतर मंजुश्री यांनी दिलेला हा संदेश आपल्या सर्वांसाठी साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ. मंजूषा कुलकर्णी MaxWoman वर. | https://youtu.be/Lqu-YF4G-rw |
| ४ | डॉ. मंजूषा कुलकर्णी यांना साहित्य अकादमी पुरस्कार | https://www.madhyamvruttseva.com/डॉ-मंजूषा-कुलकर्णी-यांचा/ |

| | | |
|---|---|---|
| ५ | महाराष्ट्राचे माननीय<br>राज्यपाल यांचे ट्वीट | <https://twitter.com/mah<br>a_governor/status/<br>@maha_governor<br>1439559856764030979<br>?s=08<br><https://twitter.com/mah<br>a_governor/status/143955<br>9859536482304?s=08 |
| ६ | संस्कृत भाषाव्रताचा सन्मान<br>'प्रकाशवाटा' या डॉ. प्रकाश<br>आमटे यांच्या आत्मचरित्राचा<br>संस्कृत अनुवाद<br>डॉ. कुलकर्णी<br>यांनी 'प्रकाशमार्गा:' | https://www.loksatta.com<br>//lokrang/sahitya-<br>akademi-award-for-<br>translation-autobiography-<br>of-prakash-<br>amte-poet-prof-dr-<br>manjusha-kulkarni-<br>prakashwata-zws-<br>70-2612674/lite/<br>?utm_source=whatsapp_<br>web&utm_medium=social&<br>utm_campaign=socials<br>harebuttons |
| ७ | https://mr.wikipedi<br>a.org | https://mr.wikipedia.org/<br>wiki/मंजूषा_कुलकर्णी |
| ८ | प्रा.डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>यांचा महाराष्ट्र राज्याच्या<br>मा. राज्यपालांच्या हस्ते<br>अभिनव साहित्यिक विक्रम<br>केल्याबद्दल सत्कार | https://youtu.be/<br>6x7BRzz_seo |

| | | |
|---|---|---|
| ९ | प्रशासक आणि संस्कृत विद्वान - डॉ. मंजूषा कुलकर्णी यांच्याशी भेट (डीडी न्यूजद्वारे) | https://youtu.be/<br>7a5dNUZKnRk |
| १० | @MahaGovtMic | https://twitter.com<br>MahaGovtMic/status<br>1476551366352924<br>672?s=08 |
| ११ | कवयित्री डॉ.मंजूषा कुलकर्णी यांचा जागतिक काव्य विक्रम केल्याबद्दल राज्यपालांच्या हस्ते सत्कार 'साहित्यिक व संतांनी देश एकसूत्रात बांधला' भगतसिंह कोश्यारी | https://twitter.com/<br>InfoVidarbha/status/<br>1418559733921816<br>580?s=20 |
| १२ | साहित्याच्या पारावर<br>डॉ. मंजूषा कुलकर्णी<br>सखी सह्याद्री - डीडी<br>सह्याद्री दूरदर्शन मुंबई | https://youtu.be/<br>VEJcY4GX7tg |
| १३ | सखी सह्याद्री | <https://youtu.be/IT<br>LxInwuJc ; https:/<br>youtu.be/7a5dNUZKnRk |
| १४ | खास कार्यक्रम / नवदुर्गासह<br>डॉ.मंजूषा कुलकर्णी /<br>नवरात्री स्पेशल /<br>सकाळ मीडिया | https://youtu.be/<br>m1Ot_LzxI4k |

| | | |
|---|---|---|
| १५ | मनीषा नवपुते यांची<br>फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/<br>story.php?story_fbid=1266<br>533350529198id=10001517<br>6343763&sfnsn=wiwspwa |
| १६ | संजीव खानझोडे यांची<br>फेसबुक पोस्ट | https://m.facebook.com/<br>story.php?story_fbid=<br>4429100480484776<br>id=100001546044035<br>sfnsn=wiwspwa |
| १७ | ऑडिओ अल्बम –<br>''सर्ग_निसर्ग'' ऑडिओ<br>अल्बम – ''मंजुमंजिरी'' | <https://vy6s8.app.goo.gl/<br>NKnJ><br>https://vy6s8.app.goo.gl<br>/A8Z5 |
| १८ | Special Screening of<br>100th Episode of<br>Mann Ki Baat from<br>Raj Bhavan | https://www.youtube.com<br>/live/7-dyWQaLA?si=mid<br>7qSf_HIM6WQ8q |
| १९ | स्वामी विवेकानंद<br>व्याख्यान : भाग – १ | https://youtu.be/TrNMBV_<br>ysf8?feature=shared |
| २० | स्वामी विवेकानंद<br>व्याख्यान : भाग –२ | https://youtu.be/NpvMk-<br>Pu4dOs?si=typfHtOvNg-<br>1hDXgT |

**सारांश :**

- एकूण अनुभव (शैक्षणिक) : २२ वर्षे
- एकूण अनुभव (प्रशासकीय) : १३ + वर्षे
- व्याख्याने आणि भाषणे : १००० पेक्षा जास्त
- प्रवचने : ५०० हून अधिक
- शोधनिबंध प्रकाशित : १०० हून अधिक
- स्वलिखित पुस्तके (प्रकाशित) : ७५
- स्वलिखित पुस्तके (आगामी) : २८
- संशोधन प्रकाशने : १६
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत सहभाग (आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय) : ४०
- परिषद / सेमिनार / कार्यशाळेत स्रोत-व्यक्ती / तज्ज्ञ म्हणून सहभाग : २०० हून अधिक
- पुरस्कार : २०० पेक्षा जास्त
- मिळालेल्या शिष्यवृत्ती : ९
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. पदवी प्राप्त विद्यार्थी : ०५
- डॉ. मंजूषा यांच्या मार्गदर्शनात पीएच.डी. संशोधन कार्य सुरू असलेले विद्यार्थी : ०४

• • •